ज्योतिर्विद् मंडळ ग्रंथमाला—ग्रंथ ५ वा.

विवाह प्रदीप

अथवा

वधुवर निश्चय पद्धति

लेखक

यशवंत केशव प्रधान

मुंबई येथें

श्री गणेश प्रिंटिंग प्रेसमध्यें छापून प्रसिद्ध केलें.

शके १८३२

किंमत ८ आणे.

"आदित्यानामहं विष्णु ज्योंतिषां रविरंशुमान्
मरीचिर्मरुतामस्मि नक्षत्राणामहं शशी"

श्री० भ० गीता–१०

*

"He collects the Fiery-Dust. He makes Balls of Fire, runs through them, and round them, infusing life thereinto then sets them into motion; some one way, some the other way. They are cold, he makes them hot. They are dry, he makes them moist. They shine, he fans and cools them. Thus acts Fohat from one Twilight to the other, during seven Eternities"

Secret Doctrine Vol I.

*

अर्पण पत्रिका.

प्रसिद्ध

सायन फलज्योतिषी व इंडियन सायक्लिक सिस्टिमचे
उत्पादक व मुंबई ज्योतिर्विद मंडळाचे माजी अध्यक्ष

ती. रा. रा. कै. जिवनराव त्रिंबक चिटणीस

यांस

हे लहानसें पुस्तक
त्यांचे अंगी बसत असलेली मार्मिक शोधकबुद्धि,
ज्योतिषशास्त्रांतील निपुणता, विद्याव्यासंग, स्पष्टवक्तेपणा, अत्यंत
निरपेक्षबुद्धि, सहिष्णुता इत्यादि गुणांवर लुब्ध होऊन,
ग्रंथकर्त्यावर जें पुत्रवात्सल्यानें प्रेम केलें व त्यास जी
वेळोवेळीं ज्योतिषशास्त्राचे अध्ययनांत मदत
केली त्या ऋणांतून अंशतः मुक्त होण्या-
करितां ग्रंथकर्त्यानें त्यांचा एक प्रिय
शिष्य या नात्यानें अत्यादरानें
अर्पण केलें असे.

यशवंत केशव प्रधान.

"Astrology is eternally true, but it is not an easy matter to interpret its truths to those who are not astrologers born. None but God can interpret the whole of astrology, and although Adept astrologers may try to reveal that which is revealed to them on the plane to which their consciousness is expanded. It is a great thing to understand profound statement that Astrology is God's law; but it is an even greater thing to have realised some of the workings of that law."

*

* *

ॐ

मंगलं दिशतुनो विनायको मंगलं दिशतु नः सरस्वती ।
मंगलं दिशतुनः समुद्रजा मंगलं दिशतुनो महेश्वरी ॥

प्रस्तावना.

—: :—

'शास्त्रात् रूढिर्बलीयसी' या उक्तीस अलीकडे जिकडे तिकडे जास्त महत्व येत असून शास्त्र व रूढी यांमध्यें विरोध असलेला दिसून येतो. लोकांचा विश्वास शास्त्रावरून उडून चाललेला आहे. जो तो अमुक एक रूढी आहे तमुक प्रकारची चाल आहे, अशा प्रकारानें कोणतीही गोष्ट करण्यास सिद्ध होतो. प्राचीन ऋषींनीं आपल्या स्वानुभावानें जे नियम घालून दिले त्यांसच शास्त्र अशी संज्ञा आहे. व त्यांनीं ते नियम केवळ सर्व जनतेचें ज्यांत कल्याण आहे अशाच भक्कम पायावर रचून ठेविले आहेत. कोणतेंही शास्त्र घेतलें तरी त्यास हाच नियम लागू आहे. परंतु आजकाल लोकांची प्रवृत्ति ते नियम मोडण्याकडे होत असल्यामुळें त्यापासून भयंकर हानि मात्र होत आहे. शास्त्र आणि रूढी यांत हा असलेला फरक अजीबात नाहींसा व्हावा याकरितां हल्लीं नाना प्रकारचे प्रयत्न चालू आहेत. गणितशास्त्र, रसायनशास्त्र, ज्योतिषशास्त्र वगैरे प्रमुख शास्त्रांत विद्वानांनीं बरीच क्रांती घडवून आणलेली आहे. शास्त्रांचा पूर्णपणें शोध करावा, जुने नियम कोणत्या आधारावर स्थापन केलेले आहेत तें पहावें व हल्लींच्या वस्तु स्थितीशीं त्यांचा मेळ कसा बसवावा अशा धोरणावर प्रयत्न चाललेले आहेत. पाश्चिमात्य लोकांनीं या बाबतींत धूरीणत्व पतकरलें आहे व त्यांचेंच अनुकरण आम्हीं आज थोड्याबहुत प्रमाणांत करीत आहोंत. ज्योतिषशास्त्रांत तर त्यांनीं फारच महत्वाची सुधारणा केली आहे.

ज्योतिषशास्त्राची गरज आपणांस पावलो पावलीं लागते; विशेषतः हिंदु लोकांस तर फारच लागते. त्यांचें प्रत्येक गृहकृत्य ज्योतिषशास्त्राच्या आ-

नसतें. श्रीयुत रा. रा. महादेव भिकाजी पटवर्धन, श्रीयुत रा. रा. लक्ष्मण बाळकृष्ण राजे, श्रीयुत रा. रा. मार्तंड सखाराम प्रधान, श्रीयुत रा. रा. कृष्णनाथ गणेश पालकर बी. ए. एल एल बी. व दुसऱ्या माझ्या इतर मित्रांही अविश्रांत श्रम करून लेखकास प्रुफें तपासण्यापासून तों ग्रंथ अमुक तऱ्हेनें लिहावा, त्यांत अमुक एक प्रकारची माहिती असावी ह्याप्रमाणें मदत करून उत्तेजन दिलें त्यामुळें ग्रंथकर्ता त्यांचा फारच ऋणी आहे. त्याचप्रमाणें श्रीयुत रा. रा. विष्णु गोपाळ नवाथे संपादक **कुंडलीविज्ञान** यांही लेखकाचे बोबडे बोल आपल्या मासिकपुस्तकांत वारंवार प्रसिद्ध करून जें उत्तेजन दिलें त्याच योगानें लेखकास आज हें लहानसें पुस्तक जनसमाजास सादर करितां आलें, त्या योगानें ग्रंथकर्ता त्यांचा अत्यंत अभारी आहे.

असो ज्या परमेश्वरानें ही लहान लोकसेवा करण्याची सुबुद्धि दिली त्यास प्रथम वंदन करून व ज्याच्या कृपेनें या शास्त्रांत थोडी बहुत प्रगति झाली ते माझे परमपूज्य गुरु कै. रा. रा. जिवनराव त्रिंबक चिटणीस त्यांस मनानें प्रणाम करून ही प्रस्तावना संपवितों.

दादर
ता. २२ एप्रील १९१०
८–२७ ए. म. स्टा. टा.

ग्रंथकर्ता.

श्री

विवाह प्रदीप

अथवा

वधुवर निश्चय पद्धति.

उपोद्घात.

जयति जगतः प्रसूतिर्विश्वात्मा सहजभूषणं नभसः ॥
द्रुतकनकसदृशदशशतमयूखमालार्चितः सविता ॥

अर्थः—सर्व जगत् ज्यापासून उत्पन्न होतें असा, स्थावर जंगमात्मक जगाचा आत्मा, आकाशाचें स्वाभाविक भूषण, पातळ झालेल्या सुवर्णासारख्या हजार किरणांच्या मालेनें पूजित असा सूर्य सर्वोत्कर्षे वर्ततो.

गृहसुख हें बहुतेक अंशीं गृहिणीवरच अवलंबून असतें. एखाद्या माहासागरांतून सुखकर पर्यटण करावयाचें असतां त्यास ज्याप्रमाणें उत्तम नौका व नावाडी ह्यांची गरज असते, त्याच प्रमाणें ह्या संसाररूपी भवसागरांतून ज्यास आपली इह लोकींची संसार यात्रा सुखकर व्हावी अशी इच्छा असेल त्यास सुगृहिणी ही साह्यकारी असली पाहिजे. संसाररूपी शकटाची पति व पत्नी हीं दोन चक्रें आहेत, यांपैकीं जर एक चक्र लंगडें असेल तर तो शकट सुरळीत रीतीनें चालणार नाहीं.

आमच्या विद्वान् व अत्यंत विचारी आर्य पूर्वजांनीं आपल्या विवाह संस्थेचा पाया फार खोल व मजबूत घातला आहे व इतका विचार पूर्वक खोल व मजबूत पाया जगांतील इतर कोणत्याही राष्ट्राचे विवाह संस्थेचा

आढळणार नाहीं. अर्थात आमची विवाह संस्था जगांतील इतर राष्ट्रांतील सर्व लग्न संस्थांपेक्षां अति पवित्र असल्या कारणानें ती तितकीच चिरस्थायी आहे, विशेष उन्नत आहे व विशेष उदात्तही आहे. जगांतील सर्व ऐहीक सुखें प्राप्त व्हावीं, धर्म, अर्थ काम हे तीन पुरुषार्थ सहज साधतां येऊन इष्ट-मित्र, अतिथी अभ्यागत, पशुपक्षी ह्या सारख्या जगांतील लहान मोठ्या प्राण्यांस देववेल तेवढें सुख देतां यावें, वेदविहित यज्ञयागादि पुण्यकर्मे करतां यावीं, धर्माची व प्रजेची अभिवृद्धि होऊन आपल्या उभय कुलांतील पूर्वजांचा उद्धार होऊन अंतीं मोक्ष साधतां यावा हेंच आमच्या विवाह विधीचें अंतिम साध्य आहे; असें आमचे आर्य पूर्वज सांगत आहेत व ह्याच करितां आह्मांस विवाह करण्यास सांगितलें आहे; किंबहुना आमच्या विवाह संस्थेचें रहस्य ह्यांतच आहे. व ह्मणूनच इतर राष्ट्रांप्रमाणें आमच्यांतील विवाहसंबंध तोडतां येत नाहींत.

आमच्या धर्म शास्त्रांत १ ब्राह्म, २ दैव, ३ आर्ष, ४ प्राजापत्य, ५ असुर, ६ गांधर्व, ७ राक्षस आणि ८ पैशाच असे आठ प्रकारचे विवाह सांगितले आहेत. परंतु आज ज्यांच्यांत वधुवर पत्रिका संमेलन करून लग्में ठरवितात अशा बहुतेक ज्ञातींत ब्राह्मविवाह पद्धत चालू आहे व तीच पद्धत शास्त्रकारांनीं उत्तम ठरविली आहे. इतर प्रकारचे विवाह कांहीं जातींत चालू असतील. ब्राह्मविवाहांत शास्त्राधाराप्रमाणें मुलीचे बापानें वरास आपले घरीं बोलावून त्यास आपली उपवर कन्या यथाशक्ति अलंकृत करून पूर्वी सांगितलेल्या उद्देशानें दान करावयाची असते. परंतु आजकालचे विवाह असे होत नसून त्यांस देवघेवीच्या व्यापाराचें स्वरूप येत चाललें आहे ! ! अमुक हुंडा दिला पाहिजे अमुक करणी केलीच पाहिजे, जाण्या-येण्याचा खर्च दिला पाहिजे वगैरे शेंकडों अटी वरपक्षाकडून वधुपक्षास घालण्यांत येतात; अजूनही चाल रजिस्टर होण्यापर्यंत गेली नाहीं हेंच आ-मचें सुदैव होय ! ! व हा प्रकार जुन्या अशिक्षित लोकांपेक्षां नव्या सुशि-क्षित व सुधारक म्हणविणाऱ्या लोकांतच जास्त दिसून येत आहे; व हुंड्या-

चें मान मुलाची प्रवेश परिक्षा अथवा विश्वविद्यालयांतील एक दोन परीक्षा ज्या मानानें उतरल्या असतील त्या मानानें कमी जास्त होत आहे) ! ह्यामुळें कित्येक मुलींचे बाप धुळीस मिळाले आहेत ! ! अशा रीतीनें धर्म, कुलाचार, वगैरे गुंडाळून स्वार्थपरायण होऊन शास्त्रोक्त विवाहाचे उदात्त तत्वास हरताळ फासणें हें आमच्या सुशिक्षित ह्मणविणाऱ्या बंधूस लाजिरवाणें नव्हे काय ! ! व ह्याच मुळें कित्येकांस अशा विचित्र गृहिणी मिळाल्या आहेत कीं, त्या योगानें त्यांच्या भावी सुखाच्या आशेची कायमची राख रांगोळी होऊन कसा तरी संसारशकट ओढावा लागत आहे ! उलटपक्षीं आपले समाजांत अशींही उदाहरणें आढळून येतात कीं, गरिबीमुळें किंवा द्रव्य लोभामुळें आपल्या सुंदर मुली त्यांच्या वयाच्या व रूपाच्या मानानें जे कोणी ज्यास्त पैसे देतील अशा गरजु उल्लु, उतारवयाच्या वरपशूस, कुरुप किंवा प्रसंगी गुणहीन नवरदेवास केवळ द्रव्य तृष्णेमुळें किंवा दरिद्रावस्था वगैरे अनेक अपरिहार्य अडचणीमुळें अर्पणकरून त्यांच्या संसारसुखाची राख रांगोळी करितात. ह्या गोष्टींकडे आमच्या सुशिक्षित बंधु वर्गाचें लक्ष्य जाईल काय ?

लग्न जमविण्यापूर्वी वधुवरांच्या पत्रिका पाहण्याची चाल हिंदु, जैन व पारशी ह्या लोकांत विशेष आढळते. व त्या पत्रिका कशा पाहाव्या ह्या बद्दलचें विवेचन करण्याचा ह्या पुस्तकाचा मुख्य उद्देश आहे. वधुवरांच्या पत्रिकांचें गुणमेलन झाल्याखेरीज लग्न करणें हा गौण पक्ष होय असें आमच्यांतील बऱ्याच लोकांचे मत आहे. पत्रिका जुळविणें किंवा वधुवर पत्रिकांत प्रीतियोग होत आहे किंवा नाहीं हें पाहणें ज्योतिःशास्त्राचें काम आहे; हें शास्त्र अनुभवसिद्ध आहे; त्या शास्त्राचे सहाय्यानें मानवी प्राण्याच्या जीवन चरित्रांत काय काय गोष्टी केव्हां आणि कशा घडून येतील ह्यांची बरीच अंशानें कल्पना बांधतां येते. मागिल अनुभवावरून भावी गोष्टीबद्दल सावधगिरीनें वागणें हा मानवी प्राण्याचा स्वाभाविक धर्मच आहे. परंतु आमचेकडे पत्रिका ज्या साधनावरून केल्या जातात त्या साध-

नाची स्थिति कोण शोचनीय आहे ह्याची कल्पनाच करावी लागते. कित्येक आई बाप फक्त मुलीला अमुक वर्ष असावें अमुक तिथीस इतके वाजण्याचे सुमारास जन्म झाला असावा असें सांगून पत्रिका करवून लग्नें जुळवितात!! व कित्येकांची तर ह्याचे पलिकडे धांव असते !!

आपल्या भावी पत्नीचा किंवा पतीचा स्वभाव, आयुर्मर्यादा, संतती, संपत्ती वगैरे गोष्टी जाणण्याची प्रत्येकाची इच्छा असते व ती पुष्कळ अंशी याच शास्त्राचे योगानें पूर्ण होते. ह्मणूनच आमच्या पूर्वजांनीं घटित पाहण्याची चाल पाडली असली पाहिजे. पण वरील प्रकारानें आह्मी नुसत्या चालीचा फार्स करून या शास्त्राची थट्टाच करित आहों असें मोठ्या कष्टानें ह्मणावें लागतें. पत्रिकांच्या अभावीं कन्या गुणी वरांस देणें हा उत्तम मार्ग सोडून खोट्या नाट्या पत्रिका पाहण्याचा उपटसूळ आईबाप आपले खांद्यावर कां घेतात तें कळत नाहीं.

ज्योतिषशास्त्र दृष्ट्या वधुवरांच्या कुंडल्या जुळविणें हें काम किती नाजुक व महत्वाचें आहे व तें किती विचारपूर्वक केलें पाहिजे ह्याची अंशतः कल्पना जे हें पुस्तक समग्र वाचतील त्यांस सहज होईल.

पुष्कळ लोक जोशाकडे जाऊन कुंडल्या जमवितेवेळीं अमुक एक स्थळ फार चांगलें आहे, हुंडा थोडा पडत आहे परंतु मंगळ जरा अनिष्ट आहे तर ह्यास कांहीं हरकत आहे काय वगैरे गोष्टी सांगून जोशिबुवांना आपल्या तर्फेचें मत देण्यास लावितात; व कचित्वेळीं पत्रिकाही फिरवून घेतात ह्यापेक्षां वधुवरांच्या कुंडल्या न पाहतां लग्न करणें हा उत्तम पक्ष होय.

हल्लीं प्रचारांत चालू असलेली घटित जुळविण्याची पद्धत फारच अपुरी आहे व तिच्यावर सर्वस्वी अवलंबून राहतां येत नाहीं असें अनुभवास येत आहे; ह्मणूनच आज जिकडे तिकडे ज्योतिषशास्त्राची कांहीं मंडळी टर उडवीत आहेत. जोशानें ३६ गुण जुळविले असतां मुलीस भोळ्या अव-

मीत वैधव्य प्राप्त होतें किंवा पतिपत्नींत षडाष्टक आढळतें आणि म्हणूनच या शास्त्रावरील लोकांचा भरवसा दिवसेंदिवस कमी होत चालला आहे. हा शास्त्राचा दोष नव्हे तर हल्लीं चालू असलेल्या पद्धतीचा व घटित जुळविणाराचा दोष होय; जी पद्धत दोषयुक्त आहे तिच्यापासून चांगले परिणाम पाहावयास कसे मिळाव ! !

या करितां लग्न जुळविणारा ज्योतिषी अति निर्भीड असून स्पष्टवक्तेपणा हा गुण त्याचे अंगांत पूर्णपणें वास करित असला पाहिजे म्हणजे त्याचे हातून योग्य सल्ला मिळून सहसा ज्योतिषशास्त्राच्या विरुद्ध गोष्ट घडणार नाहीं.

ह्या पुस्तकांत बऱ्याच महत्वाच्या गोष्टींबद्दल थोडक्यांत विवेचन केलेलें आढळेल. अलीकडील समाजाची स्थिति लक्षांत घेतली असतां साधारणपणें मुलाचें लग्न वीस वर्षांनंतर व मुलीचें लग्न बारा वर्षांनंतर होतें. मुलाचें लग्न अमक्याच वयांत झालें पाहिजे असा निर्बंध कोठेंच आढळत नाहीं. परंतु गुणी वर मिळाल्याखेरीज कन्येचें लग्न करूं नये असें आपले आर्यशास्त्रकार जोरानें प्रतिपादन करीत आहेत. हल्लीं मुलामुलींचीं लग्नें योग्य वयाचे बाहेर होत नाहींत हें खालील वचनांवरून कळेल.

> उत्कृष्टायाभिरूपाय वराय सदृशायच ॥
> आप्राप्तामपितां तस्मै कन्यां दद्याद्यथाविधि ॥ १ ॥

अर्थ—स्वरूपवान् सद्गुणीवराला जिला कामेच्छा उत्पन्न झाली नाही (अप्राप्ता) अशी कन्या द्यावी.

> एवंच यावद्रजोदर्शनं भवति तावत्कन्यो-
> द्वाहो न विरुद्धं इत्युक्तं भवति ॥

अर्थ—सारांश रजो दर्शन होण्याचे पूर्वी कन्येचा विवाह केला असतां शास्त्रविरुद्ध होत नाहीं.

> काम मारणात्तिष्ठेद् गृहे कन्यर्तुमत्यपि ॥
> न चैवैनां प्रयच्छेतु गुणहीनाय कर्हिचित् ॥ १ ॥

अर्थ—ऋतु प्राप्त झाल्यावर देखील कन्या पित्याच्या घरीं अविवाहित राहिली तरी चिंता नाहीं; परंतु गुणहीन वराला कधींही देऊं नये.

> दद्यात् गुणवते कन्यां नग्निकां ब्रह्मचारिणे ॥
> अपिवा गुणहीनाय नोपरुन्ध्याद्रजस्वलाम् ॥ १ ॥

अर्थ—जिला ऋतु दर्शन झालें नाहीं अशी कन्या सद्गुणी ब्रह्मचारी वराला द्यावी. सद्गुणी वर न मिळाला तर तिला ऋतुदर्शन झालें तरी हरकत नाहीं; परंतु गुणहीन वराला देऊं नये.

ऋतु प्राप्त झाल्यावर कन्येनें तीन वर्षे पित्याच्या आज्ञेची वाट पाहून चवथ्या वर्षी आपण स्वतः योग्य वर पसंत करून वरावा. असें आमचे मनु वगैरे शास्त्रकार सांगत आहेत. गोभिलगृह्यसूत्रांत ऋतुमतीचाच विवाह प्रशस्त आहे असें जोरानें प्रतिपादन केलें आहे. वरील विवेचनावरून आमचे पूर्वज कन्येला योग्य वर शोधून काढण्याकरितां किती दक्ष होते याची साक्ष पटेल. नाहींतर आम्हीं त्याच पूर्वजांचे वंशज, नुसत्या हुंडा वगैरे गोष्टींवर भुलून जाऊन घटित जुळविण्याचा निव्वळ फार्स करीत आहों ! !

विवाहास योग्यवधू.

> कुलमग्रे परिक्षेत ये मातृतः पितृत श्चेति ।
> अनन्यपूर्विकाम् कान्तामसपिण्डांयवी यसीम् ॥
> अरोगिणीं भ्रातृमतीमसमानार्षगोत्रजाम् ॥ १ ॥

कन्येच्या मातृवंशाची व पितृ वंशाची परिक्षा करून सत्कुलांतील कन्या वरावी. तसेंच दान किंवा उपभोग या संबंधीं जिचें ग्रहण दुसऱ्यानें केलें नाहीं, आपल्याशीं जिचें सापिंड्य नाहीं, आपल्यापेक्षां वयानें लहान व शरिरानें निरोगी, सोदर भ्रात असलेली, आपल्या गोत्राहून भिन्न गोत्रांत उत्पन्न झालेली व आपल्याशीं समवर नाहीं अशा कुलांतील कन्येशीं विवाह करावा.

विवाहापूर्वी " जनपदधर्मग्रामधर्मांश्चतान् विवाहे प्रतीयात् " या सूत्राप्रमाणें देशाचार, कुलाचार व ग्रामाचार यांचा नीट विचार केला पाहिजे ह्या शिवाय आतेबहीण, मावसबहीण, मामे बहीण यांच्याशीं विवाह करूं नये. कित्येक ठिकाणीं मामेबहिणीशीं लग्न लावितात. कित्येकांचे मतें पूर्वी आर्य लोकांत बहिणीबरोबर लग्न लावण्याचा प्रघात होता त्याच चालीपैकीं ही एक चालत आलेली रुढी आहे. हल्लीं पार्शी व मुसलमान लोकांत चुलतबहिणीबरोबर लग्न लावण्याची चाल आहे. मुसलमानांत भावास 'यार' या संज्ञेनें संबोधितात. आपल्या बायकोच्या बहिणीच्या मुली, चुलत्याच्या बायकोची बहीण, सापत्न मातेची बहीण व त्या बहिणीच्या मुली ह्यांबरोबर विवाह करूं नये असें ह्मणतात.

अलीकडे वधूची कुलपरिक्षा, तिचें रमणियत्व किंवा तिचे अंगीं असलेले गुण इत्यादि गोष्टींचें सार हुंड्याच्या व मानपानाच्या रकमेंत येऊन बसल्यामुळें विवाहास ठरविलेली वधु निरोगी आहे किंवा पतीस कितपत आनंद देणारी असेल वगैरे गोष्टींची चर्चा मुळींच करीत नाहीत. वधूची कुलपरिक्षा झाल्यानंतर, गण, गोत्र, नाडी इत्यादि गोष्टींचें घटित जुळवितात व नंतर वधू परिक्षेचा फार्स उडतो. त्या वेळेस तिची अंगकांती, प्रकृती, लिहिणें वाचणें, दृष्टी, अवयांतील खोड इत्यादि संबंधानें थोडी बहुत चर्चा होते. व नंतर मुलीच्या वर्णनाप्रमाणें देण्याघेण्याचें ठरवून लग्न कायम करितात. कित्येक लोक नुसत्या फोटोवरून लग्नें जुळवितात व कांहीं तर वरील कोणतीही गोष्ट न पहातां लग्नें करितात. यामुळें कित्येकवेळां अनिष्ट परिणाम घडतात. ३६ गुण मिळाले असतांही लग्नाच्या अक्षता डोक्यावर पडतात न पडतात तोंच वैधव्य दशा प्राप्त होते, याबद्दल कोणी विचार केलेला दिसत नाहीं. अनिष्ट मंगळ, संतति, संपत्ति, वैधव्ययोग इत्यादि मुख्य गोष्टींचा जातकदृष्ट्या विचार केला पाहिजे ह्मणजे असले अनिष्ट परिणाम बऱ्याच अंशीं टाळतां येतील असा भरंवसा आहे.

राशि, नक्षत्रें व त्यांचे विभाग.

जन्मकाली जन्मस्थळाच्या पूर्व क्षितिजावर जो आकाशाचा भाग (राशि) उदित असतो त्यासच लग्न असें म्हणतात.

कुंडली म्हणजे क्रांतिवृत्तस्थ ग्रहस्थितीचा त्या जन्मकाळचा नकाशा होय.

सूर्य ज्या दीर्घ वर्तुल मार्गांतून भ्रमण करितोसा दिसतो त्यास आपण **क्रांतिवृत्त** असें म्हणतों. खरें म्हटलें असतां क्रांतिवृत्त हा पृथ्वीचा सूर्या भोवतीं फिरण्याचा दीर्घवर्तुल मार्ग होय.

क्रांतिवृत्ताचे समान बारा भाग कल्पिले आहेत, त्यास **राशि** असें म्हणतात व ह्याच बारा राशींपैकीं जी राशि पूर्व क्षितिजावर जन्म कालीं उदय पावलेली असते तीस लग्न असें म्हणतात. प्रत्येक राशि ३० अंशाची असते. साधारणतः निरयण वादी लोक ही राशि आंकड्यानें दाखवितात व जे अंश उदय पावतात ते निराळे दाखवितात. राशि १२ आहेत त्यांचीं नांवें:—

मेष, वृषभ, मिथुन, कर्क, सिंह, कन्या, तूळ, वृश्चिक, धन, मकर, कुंभ, मीन.

बारा लग्नांचें भ्रमण २४ तासांत होतें म्हणून आपलेकडे एक लग्न पूर्व-क्षितिजावर सरासरी दोन तास असतें व लग्नाचा १ अंश होण्याला ४ मिनिटें लागतात. जर जन्मकाल ४ मिनिटें चुकला तर १ अंशाचा फरक पडतो यावरून जन्मकाल किती बरोबर असावा लागतो याची सहज कल्पना होईल.

क्रांतिवृत्ताचे सत्ताविस समान भाग कल्पिले आहेत त्यांस **नक्षत्रें** असें म्हणतात व म्हणून प्रत्येक नक्षत्र १३ अंश २०.कलांचें असतें.


जन्मकाळीं चंद्र ज्या राशींत असतो त्यासच व्यवहारांत **राशि** असें ह्मणतात.

घटित जुळवितांना जन्म काळचा चंद्र ज्या राशींत व ज्या नक्षत्रांत असतो त्याचा उपयोग करितात व त्या वरून गण, नाडी, वर्ण इत्यादि ठरवितात.

कुंडलीचे बारा भाग कल्पिले आहेत व त्या प्रत्येकास **भाव अथवा स्थानें** ह्मणतात. त्यांचीं नांवें व त्यावरून कोणत्या गोष्टींचा बोध होतो तें पाहूं.

द्वादश भाव विचार.

बाजूस मांडिलेली कुंडली पहा. हींत १२ स्थानें दर्शविण्याकरितां अनुक्रमानें एक, दोन असे अंक मांडिले आहेत.



(१) **प्रथम भाव** यास तनुस्थान किंवा लग्न असें ह्मणतात. व ह्मावरून खालील गोष्टींचा विचार करितात.

शरीरवर्णचिन्हायुर्वयोमानंसुखाऽसुखं ॥
जातिः शीलंच मतिमान् लग्नात् सर्वं विचिंतयेत् ॥

अर्थ—शरीर–रोड अगर पुष्ट, वर्ण–गौर किंवा काळा, शरीरावरील चिन्हें, अल्पायु, मध्यमायु किंवा दीर्घायु, सुख दुःख, जाति, स्वभाव इत्यादि गोष्टींचा विचार ह्या भावावरून करावा.

(२) **द्वितीय भाव**–ह्यास धनस्थान, कुटुंबस्थान अथवा कोशस्थान ह्मणतात: व ह्या स्थानावरून खालील गोष्टींचा विचार करावाः—

कौटुंबाद्गर्द्रव्यान्मुखंच वाग्दक्षिणाक्षि पूर्वार्थान् ॥
विद्याभुक्ति विशेषान् दासान्मित्राणि च प्रवदेत् ॥१॥

अर्थ—द्वितीय स्थानावरून कुटुंब (पुरुषाचे कुंडलींत स्त्री सौख्य व स्त्रीचे कुंडलींत भर्त्याचें सौख्य) मुख, वाणी, उजवा डोळा, वडिलार्जित द्रव्य, विद्या, भोग, दासदासी, मित्र इत्यादि गोष्टींचा विचार करावा.

(३) तृतीय भाव ह्यास भ्रातृस्थान, सहजस्थान, पराक्रमस्थान असें ह्मणतात. व ह्यावरून खालील गोष्टींचा विचार करितात.

सहजेन सहजविक्रमौषधसहायान्गलो रसस्थानम् ॥
विद्यादक्षिणकर्ण भक्ष्य विशेषांश्च मूलादीन् ॥ १ ॥

अर्थ—तिसरे भावावरून भाऊ व बहिणी, पराक्रम, औषधि, सहाय, गळा व ऊर, उजवा कान, कंदमूलादि खाण्याचे पदार्थ इत्यादि गोष्टींचा विचार करावा.

(४) चतुर्थ भाव—ह्यास मातृस्थान अथवा सुखस्थान ह्मणतात. ह्या भावावरून खालील गोष्टींचा विचार करितात.

बंधुभवनेबंधूनगृहमातृजलात्मवृद्धिरभोज्यादीन् ॥
वाहनहृदयस्कंधासनशयनसुखान्यथोजलंब्रूयात् ॥ १ ॥

अर्थ—चतुर्थ स्थानावरून गृह, शेत, जमीन स्थावरमिळकत, आई, आत्मोन्नति, खाण्याचे पदार्थ, वाहन सुख, हृदय स्कंध (खांदे) आसन, शयन, कूप इत्यादि गोष्टींचा विचार करितात.

(५) पंचम भाव—ह्यास सुतस्थान, विद्यास्थान असें ह्मणतात. व ह्यावरून खालील गोष्टींचा विचार करावा.

सुत भवनात्सुतबुद्धिमंत्रिणामपिमंत्र भोजन पितृ भावान् ॥
हृदयोदरप्रवेशं विवेकशक्तिंच निर्दिशेन्मतिमान् ॥ १ ॥

अर्थ—पंचम भावावरून बुद्धिमान् जोतिषानें संतति, बुद्धि, मंत्रित्व (राज कारण पटुत्व) मंत्र, भोजन, पितृभाव, हृदय, गर्भ, विद्या, विचार-शक्ति इत्यादि गोष्टींचा विचार करावा.

(६) षष्टभाव—ह्या स्थानास रिपु अथवा रोगस्थान ह्मणतात. ह्यावरून खालील गोष्टींचा विचार करावा.

आरिभवानादरिचोरक्षतविघ्न क्लेशना भ्युदर देशान् ॥
मधुरादिषड्रुपदंशान् ग्रहराइयुदितान् वदेत्प्राज्ञः ॥ १ ॥

अर्थ—षष्ट भावावरून शत्रु, चोर, जखमा, विघ्न, क्लेश, उदर रोग व मधुरादि सहा प्रकारचे उपदंश ह्यांचा षष्टभावारंभी जी राशि व षष्टभावांत जे ग्रह असतील त्यावरून विद्वानानें विचार करावा.

(७) सप्तम भाव—ह्यास जाया, जामित्र, स्त्रीचे कुंडलींत पतिस्थान असें ह्मणतात व ह्यावरून खालील गोष्टींचा विचार करावा.

युवति पदादुद्वाहं भार्यापति सूपदधि गुडक्षीरम् ॥
आगमगमन मदार्ति ब्रूयान्मूत्रा शयंच नष्ट धनम् ॥ १॥

अर्थ—सप्तम भावावरून विवाह विचार, स्त्रीचे कुंडलींत तिच्या नवऱ्याचा व पुरुषाचें कुंडलींत त्याच्या बायकोचा विचार, दहीं, दूध, आगमन, गमन, नाहींशी झालेली वस्तु, चोरीस गेलेलें द्रव्य, मूत्राशय इत्यादि गोष्टींचा विचार करावा.

(८) अष्टम भाव—ह्यास मृत्युभाव व आयुर्भाव असें ह्मणतात व ह्यावरून खालील गोष्टींचा विचार करावा.

मरणाज्जीवित मरणं गुह्यस्थानंच मरण हेतुंच ॥
अन्नमुखं भृतिदंशं परिभवमपि चिंतयेत् प्राज्ञः ॥ १ ॥

अर्थ—मरण, गुह्यस्थान, मरणाचें कारण, अन्नमुख, पराभव, सर्पादिकांचे दंश इत्यादि गोष्टींचा विचार करावा.

(९) नवम भाव—ह्यास भाग्यस्थान अथवा धर्मस्थान असें ह्मणतात.

शुभभवनाद्गुरुभाग्यं पितृपौत्रदयातपः प्राप्तिम् ॥
ऊरुस्थानं स्वांनं सहभोक्तृन् दानयोगमपि विद्यात् ॥१ ॥

अर्थ—नवमस्थानावरून गुरु, भाग्य, पिता नातवंडें, तप, दया, लाभ ऊरुस्थान (मांड्या) दान, योग, साधन इत्यादि गोष्टींचा विचार करावा.

(१०) दशम भाव—ह्या भावास पितृभाव व कर्मस्थान असें ह्मणतात.

दशमात्प्रवृत्तिमाज्ञां कीर्तिं वृष्टिं प्रवासपूर्तादीन् ॥
मानं कर्माजीवं जानुस्थानंच निर्दिशेद्दासान् ॥ १ ॥

अर्थ—दशमभावावरून उदर निर्वाहाचा धंदा, हुकमत, कीर्ति, वृष्टी, प्रवास, वापि कूपादि, मान, जानुस्थान, दास दासी वगैरे राजैश्वर्य इत्यादि गोष्टींचा विचार करावा.

(११) एकादश भाव—ह्यास आयस्थान किंवा लाभस्थान असें ह्मणतात.

आयेनार्थावाप्तिं पादावपि वामकर्णचिंतांच ॥
ज्ञातावपि कच कुब्जाज्ज्येष्ठान्ब्रूयाद्धनान्यासाम् ॥

अर्थ—एकादश भावावरून धनप्राप्ति, पायांचा विचार, त्याचप्रमाणें डावा कान, केश, कुब्जता, थोरला भाऊ, ऐश्वर्य इत्यादि गोष्टींचा विचार करितात.

(१२) द्वादश भाव—ह्यास व्ययस्थान किंवा रिफस्थान असें ह्मणतात.

व्ययभवनाद्व्ययमखिलं पतनं नरकेच वैकल्यम् ॥
वामाक्षिचरणयुगलं शयनस्थानं विनिर्दिशेत् प्राज्ञः ॥१॥

अर्थ—द्वादश भावावरून सर्व प्रकारचा व्यय, नर्कप्राप्ति, पीडा, डावा डोळा, दोन्ही पाय, शयनस्थान, इत्यादि गोष्टींचा विचार करितात.

वरील विवेचनावरून कोणत्या स्थानावरून कोणत्या गोष्टींचा विचार करावा ह्याची सहज कल्पना होईल.

ग्रह.

—:०:—

काळोख्या रात्रीं आकाशांत पाहिलें असतां आपणास असंख्य तेजोमय गोल दिसतील; ह्यांपैकीं कांही चमकणारे असून स्थिर आढळतील व कांहींचा प्रकाश स्थिरज्योतिप्रमाणें असून तें आपलीं स्थानें आकाशांतील

स्थिरतेजोमय गोलांतून बदलत आहेत असें आढळेल. याप्रमाणें स्थिर आणि चर असे आकाशस्थ ज्योतींचे दोन प्रकार होतात. चरांपैकीं बुधादि कांहीं तेजोगोल सूर्याभोंवती फिरतात त्यास ग्रह असें ह्मणतात व जे तेजोगोल दुसऱ्या ग्रहाभोंवती फिरतात त्यास उपग्रह ह्मणतात व जे तेजोमय गोल स्थिर आहेत त्यास तारे किंवा नक्षत्रें ह्मणतात.

एकंदर ग्रह नऊ आहेत त्यांचीं नावें:-रवि, चंद्र, मंगळ, बुध, गुरु, शुक्र, शनि, हर्शल (प्रजापती) नेपच्यून (वरुण.) आपले लोक राहु व केतु यांस ग्रह मानतात; परंतु ते ग्रह नव्हेत. क्रांतिवृत्त आणि चंद्राचा परिभ्रमण मार्ग हे दोन मार्ग ज्या दोन ठिकाणीं एकमेकांस छेदितात त्या छेदन बिंदूंपैकीं एकास राहु व दुसऱ्यास केतु ह्मणतात. अर्थात हे तेजोमय गोल नाहींत. मात्र बिंदु आहेत; त्यांस प्रकाश नाहीं; गति आहे. ह्याचे कांहीं परिणाम आढळतात. प्रजापति (हर्शल अथवा युरेनस) व वरुण अथवा नेपच्यून हे दोन ग्रह नुकतेच सांपडलेले आहेत. त्यांचा बराच परिणाम आढळतो ह्मणून त्यांचा येथें निर्देश केला आहे.

शुभ व पाप ग्रह.

गुरु आणि शुक्र हे दोन ग्रह अत्यंत शुभ आहेत. रवि, चंद्र, बुध हे साधारण शुभ आहेत, कारण ते ज्या ग्रहांबरोबर दृष्टियोग करितात त्या प्रमाणें शुभ अगर अशुभ फळें उत्पन्न करितात. बुध ह्या ग्रहाबद्दल कांहींच निश्चयात्मक सांगतां येत नाहीं. शुभग्रह युक्त असून जर पीडित नसला तर अतिशुभ फलें उत्पन्न करितो. शनि, मंगळ, हर्शल, नेपच्यून व राहु हे पाप ग्रह आहेत. त्यांत शनि व मंगळ हे अति पाप फळें उत्पन्न करितात. नेपच्यून ह्या ग्रहाचा धर्म थोडा बहुत शुक्राप्रमाणें असल्याकारणानें तो शुभ फळें देतो.

राशींचे स्वामी.

मेषवृश्चिकयोर्भौमः शुक्रोवृष तुलाधिपः ॥
कन्या मिथुनयोः सौम्योगुरुस्तु धन मीनयोः ॥

शनिर्नक्रस्य कुंभस्य कर्कस्यैव तु चंद्रमाः ॥
सिंहस्याधिपतिः सूर्यः कथितो गणकैः क्रमात् ॥

अर्थः—मेष व वृश्चिक ह्या राशींचा स्वामी मंगळ.
वृषभ व तूळ ह्या राशींचा स्वामी शुक्र.
मिथुन व कन्या राशींचा स्वामी बुध.
मकर व कुंभ राशींचा स्वामी शनि.
धन व मीन राशींचा स्वामी गुरु.
कर्कचा स्वामी चंद्र व सिंहेचा स्वामी रवि.
त्याचप्रमाणें कुंभेचाही स्वामी हर्शल.
मीनेचा स्वामी नेपच्यून व कन्येचा स्वामी राहु.

कांहीं ग्रह विशिष्ट राशींत फार बलवान असतात ह्मणून त्या राशि त्यांचीं उच्चस्थानें होत व उच्चस्थानासमोरील राशि त्या ग्रहांचीं नीचस्थानें होत.

ग्रहांचें उच्चत्त्व व नीचत्त्व.

रविर्मेषे तुलेनीचो वृषेचंद्रस्तु वृश्चिके ॥
भौमश्च नक्रे कर्केच क्रियां सौम्यो झषे तथा ॥ १ ॥
गुरुः कर्केच नक्रेच मीन कन्ये सितस्यच ॥
मंदस्तुलायां मेषेच कन्या राहु ग्रहस्यच ॥ २ ॥
राहुर्युग्मे तुचापंचतमोवत्केतुजंफलम् ॥
प्रोक्तं ग्रहाणामुच्चत्वं नीचत्वं च क्रमाद्बुधैः ॥ ३ ॥

ग्रह	उच्च	नीच.
रवि.	मेष	तूळा.
चंद्र	वृषभ	वृश्चिक
मंगळ	मकर	कर्क.
बुध	कन्या	मीन

गुरु	कर्क	मकर
शुक्र	मीन	कन्या
शनि.	तूळ	मेष.
राहु	मिथून	धन

हर्शल हा वृश्चिक राशींत उच्च असतो व नेपच्यून जलराशींत उच्च असतो.

दृष्टि विचार.

आमच्या आचार्यांनीं अनुभवानें ठरविलेल्या ग्रहांच्या दृष्टि व पाश्चात्य ग्रंथकारांनीं ठरविलेल्या दृष्टि यांमध्यें सादृश्य आढळतें; तरी त्यांत भेद असल्यामुळें त्या दोन्ही दृष्टींचा ह्या पुस्तकांत विचार केला आहे. ग्रहांची शुभ किंवा अशुभदृष्टि ही ग्रहांच्या स्वभावाप्रमाणें आह्मीं मानिलेली आहे. परंतु पाश्चात्य शोधकांनीं शुभ व अशुभदृष्टि कोणत्या हें अनुभवानें ठरवून टाकिलें आहे.

आर्य ग्रंथाधारें दृष्टि विचार.

पादैकदृष्टिर्दशमे तृतीये द्विपाददृष्टिर्नवपंचमेवा ॥ त्रिपाद दृष्टिश्चतुरष्टकेचसंपूर्णदृष्टिः समसप्तकेच ॥ १ ॥ शनेस्त्रिदशेपूर्णादृष्टिर्जीवस्यकोणके ॥ बुधैर्ज्ञेयापुर्णदृष्टिर्भौमस्य चतुरष्टके ॥ २ ॥

ग्रह आपल्या स्थानापासून किंवा ते ज्या राशींत असतील, त्या राशी पासून सातव्या स्थानावर किंवा सातव्या राशीवर पूर्ण दृष्टीनें पाहतात. चवथ्या व आठव्या स्थानावर किंवा राशीवर **त्रिपाद** (पाऊण) दृष्टीनें पाहतात.

पांचव्या किंवा नवव्या स्थानावर किंवा राशींवर **त्रिपाद** (अर्ध) दृष्टीनें पाहतात.

तिसऱ्या व दहाव्या स्थानावर किंवा राशींवर **एकपाद** दृष्टीनें पाहतात.

शनि हा ३।७।१० या स्थानांवर किंवा राशीवर, गुरु हा ५।७।९ ह्या स्थानांवर किंवा राशींवर, व मंगळ हा ४।७।८ ह्या स्थानांवर किंवा राशींवर पूर्ण दृष्टिनें पाहतो.

पाश्चात्य ग्रंथाधारें दृष्टि विचार.

जो ग्रह जलद गतीनें फिरतो तो दुसऱ्या स्थिर गतीच्या ग्रहाशीं दृष्टि-योग करतो. ग्रह खालील प्रमाणें दृष्टियोग करितात;—

चंद्र हा सर्व ग्रहांत अति जलद भ्रमण करणारा असल्याकारणानें सर्व ग्रहांशीं दृष्टियोग करितो.

बुध हा शुक्र, सूर्य, मंगळ, गुरु, शनि, प्रजापति, व वरूण ह्या ग्रहांशीं दृष्टियोग करतो. ह्याप्रमाणें इतर ग्रहांविषयीं जाणावें.

अर्धवर्तुलपाद अथवा ४५ अंशदृष्टियोग म्हणजे दोन ग्रहांमध्यें ४५ अंश अंतर असतें; ह्रिचा परिणाम वाईट असतो.

द्विराश्यंतर अथवा ६० अंशदृष्टि ही फार शुभ आहे.

त्रिराश्यंतर अथवा ९० अंशदृष्टि ही अत्यंत अशुभ असून परिणाम फारच कडक आढळतात.

त्रिकोण दृष्टि अथवा १२० अंशदृष्टि ही अत्यंत शुभ आहे.

सार्ध चतुष्टय राश्यांतर दृष्टि अथवा १३५ अंशदृष्टि ही अशुभ आहे.

पूर्णदृष्टि अथवा १८० अंशदृष्टि ही फारच बलवान असून अशुभ आहे.

युतिदृष्टिही ज्या वेळेस दोन अगर अधिक ग्रह एकाच राशींत एकाच अंशांत अथवा त्यांचे मधील अंतर फारच थोडें असतें तेव्हां होते. शुभ ग्रहांशी झालेली युति चांगलें फळ उत्पन्न करिते व पाप ग्रहाशीं झालेली युति वाईट फळ देते.

समक्रांतिदृष्टि ही ग्रहांचे क्रांतीवर अवलंबून आहे. जेव्हां दोन ग्रहांची क्रांति (उत्तर अथवा दक्षिण) सारखी असते त्यावेळेस ही दृष्टि होते.

वरील सांगितलेले दृष्टियोग नेहमीं अंशात्मक पूर्ण सांपडतील असें नाहीं; याकरितां ६।७ अंश अंतर अलिकडे पलीकडे असतां त्या त्या दृष्टियोगांचें फल अनुभवास येतें. हें दृष्टीचें प्रकरण फारच महत्वाचें आहे. प्रत्येकानें या-बद्दल बारकाईनें विचार करावा.

मुख्यतः वधुवरांचे कुंडलींत खालील गोष्टींचाच विचार करणें जास्त अवश्य आहे.

१ आयुर्मर्यादा, व शरीर सुख.
२ अनिष्ट मंगळ व बहुभार्यायोग.
३ वधुवरज्ञान व सप्तमस्थानांतील ग्रहविचार.
४ वधुवरकुंडलींतिल प्रीतियोग.
५ संतती व संपत्ती संबंधानें विचार.
६ विवाहकाल.

आतां ह्यांचा क्रमशः विचार करूं.

(१) आयुर्मर्यादा व शरीर सुख.

मनुष्याचें आयुष्य किती आहे हें समजणें जितकें अत्यावश्य व महत्वाचें आहे तितकेंच तें कुंडलीवरून कळणें कठीण आहे असें प्रत्येक ज्योतिर्विदास कबूल करावें लागेल. प्राचीन व अर्वाचीन ज्योतिर्विदांनीं आयुर्दाय निश्चित करण्याचे कामीं बरीच खटपट केलेली आढळते. केशवीच्या गणिताचा, निरनिराळ्या प्रकारच्या दशा उपदशांचा उपयोग करून तसेंच अष्टवर्ग, जैमिनीयपद्धति व वराहमिराच्या बृहज्जातकांतील पद्धति एवढ्या-वरूनच केवळ आयुर्मर्यादा निश्चित करितां येईल असें वाटत नाहीं. आयु-ष्याचा विचार मुख्यतः जन्मकालिन ग्रह स्थितविरूनच करितां आला पाहिजे, व तसा विचार करितां येण्यास पुष्कळ अनुभव पाहिजे.

आयुष्यकारक कोण व त्याचा विचार कसा करावा?

सर्वसाधारण मतें म्हटलें असतां पुरुषाचे कुंडलींत रवीचा व स्त्रियांचे कुंडलींत चंद्राचा विचार करावा; कारण पुरुषाचे कुंडलींत रवि बिघडल्यां-खेरीज मृत्यु आला असें क्वचितच आढळेल. त्याचप्रमाणें स्त्रियांचे कुंडलींत चंद्र बिघडला असल्याशिवाय त्यांचा मृत्यु होणें शक्य नाहीं. लग्नाचा व शरिराचा अति निकट संबंध आहे, हेंही सहज अनुभवास येण्यासारखें आहे. लग्न (किंवा लग्नाधिपति) रवि किंवा चंद्र हे बिघडले नसतां आजारीपणा किंवा मृत्यु येणें शक्य दिसत नाहीं. यावरून या तिहींपैकीं कोणी तरी एक आयुष्यकारक असलाच पाहिजे.

रवि हा आयुष्यदायक स्थानीं असेल तर तोच आयुष्यकारक होतो. परंतु रवि जर तसा नसून चंद्र आयुष्यदायकस्थानीं असेल तर तोच आयुष्य-कारक असतो. जेव्हां रवि व चंद्र या दोहोंपैकीं कोणीही आयुष्यदायकस्थानीं नसेल तेव्हां लग्न हेंच आयुष्यकारक असतें. जेव्हां कुंडलींत रवि व चंद्र हे दोन्ही आयुष्यदायक स्थानांत असतात तेव्हां दिवसाचा जन्म असतां रवि आयुष्यकारक असतो व रात्रीचा जन्म असतां चंद्र आयुष्यकारक असतो असें कित्येकांचें मत आहे.

आयुष्यकारक स्थानें.

लग्नाच्या उदित अंशांचे पूर्वीचे ५ अंशांपासून तों २५ अंशांपर्यंत, त्याचे समोरील सप्तम स्थानाचे भावारंभाचे उदित अंशांचे पूर्वीचे ५ अंशां-पासून तों २५ अंशांपर्यंत, व नवमस्थानाचे भावारंभाचे उदित अंशाचे पूर्वीचे ५ अंशांपासून तों एकादश स्थानाचे मध्यापर्यंत हीं सर्व आयुष्य-दायक स्थानें आहेत. म्हणून जेव्हां सूर्य अथवा चंद्र हे अष्टम, द्वादश अथवा एकादश स्थानाच्या दुसऱ्या अर्धांत असतात, अथवा जेव्हां ते अनु-दित गोलार्धांत असतात त्या वेळेस लग्न हेंच आयुष्यकारक असतें.

लग्न व लग्नाचे उदित अंश हा एक स्वतंत्र ग्रह आहे असें समजून त्या-बरोबर होणारे दृष्टियोगांचा विचार करावा. कारण लग्नास होणाऱ्या

शुभदृष्टियोगानें शरीर प्रकृति चांगली असते व जिवनशक्तीचा प्रवाह जोराचा असतो. वाईट दृष्टियोग ज्या राशींतून होतात त्या राशींचे व दृष्टियोग करणाऱ्या ग्रहाचे धर्माप्रमाणें शरीर प्रकृतीस अपघात किंवा दुखणीं येतात.

अग्निराशि (मेष, सिंह व धन) लग्नीं उदय पावत असतां जीवनशक्ति फार उत्तम तऱ्हेची असते, व त्यामुळें कुंडलींत असलेल्या मारक योगांचा प्रतिकार करण्याचें सामर्थ्य अंगांत असतें, व सर्वसाधारण प्रकृति सुदृढ असते.

वायुराशि [मिथुन, तूळ व कुंभ] लग्नीं उदय पावत असतां जीवनशक्ति साधारण असून अग्नि राशिसारखी शरीर प्रकृति धट्टीकट्टी नसते.

जलराशि [कर्क, वृश्चिक व मीन] लग्नीं उदय पावत असतां जीवनशक्ति फारच कमी असून शरीर प्रकृति अशक्त असते.

पृथ्वीराशि [वृषभ, कन्या, मकर] लग्नीं उदय पावत असतां शरीर प्रकृति साधारण मानानें बरी असते.

विषमराशि [मेष, मिथुन, सिंह, तूळ, धन, कुंभ] जीवन शक्ति उत्तम प्रकारची देतात; त्यांत सिंह, तूळ व धन ह्या श्रेष्ठ आहेत.

समराशि [वृषभ, कर्क, कन्या, वृश्चिक, मकर, व मीन] लग्नीं उदय पावत असतां म्हणण्यासारखी जीवनशक्ति जोरदार अंगांत नसते.

कर्क, मकर व मीन ह्या लग्नावर ज्या मुलांचा जन्म होतो त्यांचे अंगांत जीवनशक्ति फारच कमी असते, लहानपणाचे दिवस दुखण्यांतच काढावे लागतात व फार त्रास व हाल सोसावे लागतात. वृश्चिक लग्नावर जन्मलेल्या मुलांचे अंगांत जीवनशक्ति चांगली असते. परंतु त्यांस साथीचे रोगांची फार धास्ती असते.

जी असंख्य बालकें अल्प काळांतच मृत्युच्या स्वाधीन होतात त्यापैकीं बऱ्याच जणांचीं लग्नें मकर व वृश्चिक असतात; कारण पीडित मकर

लग्नावर जन्मलेलीं बालकें फार अशक्त असतात व पीडित वृश्चिक लग्ना-वर जन्मलेल्या मुलांस देवी, गोंवर वगैरे साथींच्या रोगांची भीति असते.

शरीर संपत्ति.

कुंडली पुरुषाची असेल तर तींत रवीचा व स्त्रीची असेल तर चंद्राचा विचार जास्त केला पाहिजे.

जर रवि हा शनीकडून पीडित—पापदृष्ट असून पश्चिमषटकांत असेल ह्मणजे ९।८।७।६।५।४ ह्या स्थानांत असेल तर प्रकृती चांगली नसते व त्या मनुष्यांस कंटाळवाणी व फार दिवस टिकणारीं व त्रासदायक दुःखणीं काढावीं लागतात. कुंडलींत रविमंगळाचा कोणताही दृष्टियोग होत असल्यास चांगला, कारण त्यामुळें शरिर प्रकृती सुदृढ असते. परंतु युति, वर्तुलपाद किंवा ९० अंशदृष्टि, किंवा पूर्णदृष्टि (१८० अं.) होत असल्यास अपघात, भयंकर ताप, प्लेग सारखे रोग ह्यांची भीती असते.

स्त्रियांचे किंवा पुरुषांचे कुंडलींत रवि चंद्रामध्यें दृष्टियोग नसणें किंवा अशुभदृष्टियोग असणें चांगलें नाहीं; कारण त्यामुळें शरीर प्रकृती अशक्त असते व जीवनशक्तीचा प्रवाह फारच मंद आढळतो; मानसिक शक्ति सुद्धां साधारण आढळते. व ह्याचमुळें अशा दृष्टियोगावर जन्मलेली मंडळी पूर्णायू क्वचितच आढळतात.

रवि किंवा शनि ह्यांपैकीं एक किंवा दोघे षष्ठस्थानीं किंवा एकमेकां-समोर ह्मणजे एक षष्ठस्थानीं व दुसरा द्वादशस्थानीं असेल किंवा वर्तुलपाद दृष्टियोग (९० अं.) करीत असेल तर शरीर प्रकृती ठीक नसते. ह्या तीन योगांपैकी एक योग सुद्धां होणें इष्ट नाहीं. कारण हे योग शरीर प्रकृतीस अत्यंत घातुक आहेत.

रवीवर गुरु, मंगळ किंवा चंद्र ह्यांची शुभदृष्टि असेल तर त्या मनुष्याची प्रकृती निरोगी असून तो सुदृढ बांध्याचा असतो.

सूर्य हा लग्न, षष्ट, अष्टम ह्या स्थानांखेरीज दुसऱ्यास्थानीं असलेला चांगला कारण वरील स्थानांत तो शरीर प्रकृतीस हानिकारक असतो.

स्त्री किंवा पुरुष ह्यांचे कुंडलीत जेव्हां चंद्र हा पापग्रहानें पीडित नसून गुरु व शुक्र ह्यांचे बरोबर शुभ दृष्टियोग कारित असेल तर शरिर प्रकृती उत्तम असते; व जेव्हां लग्नीं कोणी पापग्रह नसतो व लग्न कोणत्याच ग्रहाकडून पीडित नसतें अशा वेळीं जरी शरीर प्रकृती नाजुक व अशक्त असली तरी तो मनुष्य दुखण्यास टकर देऊन वृद्धावस्थेपर्यंत जगतो.

आयुष्यदायक व मारक ग्रह.

साधारणपणें ह्मटलें असतां जे ग्रह आयुष्यकारका बरोबर शुभ दृष्टियोग करितात ते आयुष्यदायकग्रह असतात. परंतु विषेशतः लग्न, पंचम, नवम व दशम ह्या स्थानांत असलेल्या ग्रहांचे शुभ दृष्टियोग अथवा ह्या स्थानांच्या अधिपतीचे आयुष्यकारका बरोबर अथवा रविचंद्राबरोबर शुभ दृष्टियोग होणें हे फार शुभ असून फार महत्वाचें आहे, कारण त्या योगानें आयुष्य-मर्यादा चांगली असते.

साधारणपणें जे ग्रह आयुष्यकारका बरोबर अथवा रवि चंद्राबरोबर वाईट दृष्टियोग करतात ते ग्रह मारक असतात. त्यांत विषेशतः चतुर्थ, षष्ट, अष्टम, व द्वादश ह्या स्थानांतून किंवा वरील स्थानांचे अधिपतीं कडून आयुष्यकारका बरोबर अथवा रवि चंद्राबरोबर वाईट दृष्टियोग होणें हें फार अनिष्ट आहे कारण त्यामुळें आयुष्य खात्रीपूर्वक कमी होतें.

आयुष्याचा विचार करतांना आयुष्याचे तीन भाग करावे; ते असेः— अल्पायु ह्मणजे जे लहान वयांत मृत्यु पावतात ते. मध्यमायु ह्मणजे जे सरासरी ४०–५० वर्षीपर्यंत जगतात ते. पूर्णायु ह्मणजे जे ७०–९० किंवा जास्त वर्षें वांचतात ते. जर जन्मकालीं सूर्य, चंद्र व लग्न शुभ ग्रहाकडून दृष्ट असून कोणाकडूनही पीडित किंवा पापदृष्ट नसतील, अथवा ह्यापैकीं एखादा आयुष्यकारक असून वरील सारखे शुभ दृष्टियोग असतील तर तो मनुष्य पूर्णायु असण्याचा संभव असतो. परंतु ह्याचे उलट स्थिती असेल तर बालवयांतच मृत्यु येतो. व जेव्हां ही स्थिती ह्मणण्यासारखी वाईट किंवा चांगली नसते, तेव्हां मध्यमायु समजावा. वरील विचार करितांना आयुष्यदायक

व मारक ग्रह यांचा विचार चांगला व नीट रीतीनें करावा ह्मणजे आयुष्यमर्यादेबद्दल अचूक अटकळ बांधता येईल. एकंदर परिस्थिती लक्षांत घेऊन त्यावरून अनुमान बांधण्यास बराच अनुभव पाहिजे; कारण निरनिराळ्या स्थितींत ग्रह असतां मनुष्याची आयुर्मर्यादा किती असते हें सांगण्याचें काम आज तर मानवी कल्पनेच्या बाहेर आहे, असें वाटतें.

आपल्या प्राचीन ग्रंथांत कांहीं आयुर्मर्यादेचे योग आहेत त्यांतील ठळक योग खालीं दिले आहेत, त्यांचा आयुर्मर्यादेचा विचार करतानां बराच उपयोग होईल असें वाटतें.

परस्परक्षेत्रसमास्थितौ वा लग्नेशरन्ध्राधिपती न सौम्ये॥
रिष्फारिभे वांगधिपेन युक्ते त्वष्टादशाब्दे निधनं प्रयाति॥१॥
केन्द्रेषु पापेषु निशाकरेण सौम्यग्रहैर्वीक्षणवर्जितेषु ॥
षष्ठाष्टमे वा यदिवा शशांके जीवेच्छिशुर्विंशतिवर्षमात्रम् ॥

अर्थः—लग्नेश व अष्टमेश एकमेकांचे घरीं असून त्यांवर शुभ ग्रहांची दृष्टि नसेल अथवा ६।१२ भावामध्यें पंचमेश युक्त असतील तर १८ वे वर्षी मृत्यु होतो. ॥ १ ॥ केंद्रामध्यें पापग्रह व चंद्र शुभ ग्रहांनें दृष्ट नसेल अथवा केंद्रांत पापग्रह असून चंद्र जर षष्ट अथवा अष्टम स्थानांत असेल तर मनुष्य वीस वर्षे जगतो.

जीवेन सहितः सूर्यो लग्नस्थः कीटराशिगः॥
अष्टमाधिपतौ केंद्रे द्वाविंशे मरणं ध्रुवम् ॥ ३ ॥
राहुणा सहित चंद्रे जामित्रे चाष्टमेपि वा ॥
देवेज्ये लग्नगेहेस्मिन् द्वाविंशे मरणं भवेत् ॥ ४ ॥

अर्थः—गुरु, रवि सह कर्केचा लग्नीं असेल व अष्टमेश केंद्रांत असेल तर २२ वे वर्षीं मृत्यु होतो. ॥ ३ ॥ राहु युक्त चंद्र सप्तम अथवा अष्टम भावामध्यें असेल व गुरु हा लग्नीं असेल तर २२ वे वर्षीं मृत्यु होतो ॥ ४ ॥

चंद्रो मन्दसहायस्तु सूर्यश्चाष्टमसंयुतः ॥
एकोनत्रिंशके वर्षे जातो यमपुरं व्रजेत् ॥ ५ ॥
पापा जन्माष्टमार्गस्थाःसौम्याः केन्द्रबहिस्थिताः ॥
अस्मिन् योगे समुत्पन्ने त्वष्टाविंशे मृतिर्भवेत् ॥ ६ ॥

अर्थः—चंद्र शनियुक्त असून रवीसह अष्टम स्थानांत असेल तर २९ वे वर्षी मृत्यु येतो. ॥ ५ ॥ पापग्रह लग्न अष्टम व सप्तम स्थानांत असतील व शुभग्रह केंद्रांत नसतील अशा योगावर जन्मलेला मनुष्य २८ वे वर्षी मरतो. ॥ ६ ॥

जन्मरन्ध्रपयोर्मध्ये निशानाथे व्यये गुरौ ॥
सप्तविंशतिवर्षे वा त्रिंशद्वर्षेपि वा मृतिः ॥ ७ ॥
रन्ध्रेशे जीवसंदृष्टे पापे पापनिरीक्षिते ॥
रन्ध्रस्थे जन्मपे वापि अष्टाविंशे मृतिर्भवेत् ॥ ८ ॥

अर्थः—चंद्र जर लग्नेश व अष्टमेश ह्यांचे मध्यें असून गुरु व्यय स्थानांत असेल तर २७ व्या किंवा ३० व्या वर्षी मृत्यु होतो ॥ ७ ॥ अष्टमेश पापग्रह असून त्यावर गुरूची दृष्टि असून पापग्रह पाहत असतील व लग्नेश अष्टमस्थानांत असेल तर २८ व्या वर्षी मृत्यु होतो ॥ ८ ॥

अष्टमाधिपतौ केन्द्रे लग्ने तु बलवत्तरे ॥
त्रिंशद्वर्षाण्यसौ जीवेद्द्वात्रिंशद्वाथ जातकः ॥ ९ ॥
लग्नादष्टमराश्यंशे भानुपुत्रसमन्विते ॥
पापे बलाधिके लग्ने केन्द्राब्दाख्ये शुभे तथा ॥ १० ॥

अर्थः—अष्टमाधिपती केंद्रांत किंवा लग्नांत बलवान असेल तर ३० किंवा ३२ वर्षे पर्यंत मनुष्य जगतो ॥ ९ ॥ अष्टम स्थानांत शनी असेल किंवा अष्टमांत असलेल्या राशींत शनी नवमांशानें असेल, बलवान पापग्रह लग्नीं असेल व शुभग्रह केंद्रांत नसतील तर वरील प्रमाणें फळ जाणावें ॥ १० ॥

जन्माष्टमेशौ यदि केन्द्रयुक्तौ रन्ध्रे तु यः कश्चन खेचरेन्द्रः ॥
द्वाविंशके तन्मरणं शुभैस्तु केन्द्रेषु हीनेष्वहितैर्ग्रहेन्द्रैः ॥ ११ ॥
क्षीणे शशांके दिवसेशयुक्ते रन्ध्राधिपे केन्द्र गतेऽष्टमेपि ॥
पापान्विते लग्नगते विहीने द्वात्रिंशदब्दे निधनं प्रयाति ॥१२॥

अर्थः—लग्नेशव अष्टमेश केंद्रांत असून अष्टमस्थानांत कोणहि ग्रह असेल व केंद्रांत पापग्रह असून शुभग्रह नसतील तेव्हां २२ वे वर्षी मृत्यु होतो ॥ ११ ॥ क्षीण चंद्र सूर्ययुक्त असेल, अष्टमेश केंद्रांत असेल, पापग्रह अष्टम भावामध्यें असेल व बलहीन ग्रह पापयुक्त लग्नांत असेल तर ३२ वे वर्षी मृत्यु प्राप्त होतो. ॥ १२ ॥

लग्नरन्ध्रपयोर्योगे स्फुटं तत्कृत्यसंयुतः ॥
शुभैरयुक्तः पापश्चेन्मृत्युः स्यात्सप्तविंशतौ ॥ १३ ॥
लग्नाब्धि लोमे ससुतश्च चंद्रोरन्ध्रेश्वरे केन्द्रगते ससौम्यैः ॥
दृष्टे युते वा परमायुरत्र त्रिंशत्परं नास्ति बलैर्विहीनैः ॥ १४॥

अर्थः—लग्नेश व अष्टमेश याचा योग होत असेल व शुभ ग्रह युक्त नसून पापग्रह युक्त असेल तर २७ वे वर्षी मृत्यु होतो ॥ १३ ॥ द्वादश स्थानांत बुधयुक्त चंद्र असेल, अष्टमेश केंद्रांत निर्बल असून शुभग्रहयुक्त वा दृष्ट असेल तर त्या माणसाचे ३० वर्षे आयुष्यमर्यादा जाणावी. ॥१४॥

रन्ध्रेश्वरे भाग्यधनात्मयुक्ते लग्नाधिपे रन्ध्रयुते त्वसौम्यैः॥
जातश्चतुर्विंशति वर्षमात्रं जीवत्यसौ शोभनदृष्टि युक्ते।१५।
अष्टमाधिपतौ लग्ने लग्नेशे बलवर्जिते ॥
त्रिंशद्वर्षाण्यसौ जीवेत्रिंशन्नातीव वर्तते ॥ १६ ॥

अर्थः—अष्टमेश ९।२।१ ह्या कोणत्याही स्थानापैकीं एका स्थानांत असेल व लग्नेश अष्टमांत पापयुक्त अथवा पापदृष्ट असेल व दुसरा एखादा शुभग्रह जरी पाहत असेल तरी तो मनुष्य २४ वर्षेच जगतो ॥ १५ ॥ अष्टमेश लग्नांत व लग्नेश बलहीन असेल तर तो मनुष्य ३० वर्षांवर जगत नाहीं ॥ १६ ॥

आपोक्लिमगते चंद्रे लग्नेशो च तथैव हि ॥
पापेक्षिते बलैर्हीने जीवत्यायुस्तथैव च ॥ १७ ॥
गुरुशुक्रौ च केन्द्रस्थौ लग्नेशे पापसंयुते ॥
आपोक्लिमस्थे संध्यायामायुः षट्त्रिंशदेव हि ॥ १८ ॥

अर्थः—चंद्र जर आपोक्लीम ३।६।९।१२ भावांत असेल व लग्नेशही तसाच आपोक्लीम ३।६।९।१२ स्थानांत पापदृष्ट व बलहीन असेल तर वर सांगितलेलीच आयुष्य मर्यादा असते ॥ १७ ॥ गुरु शुक्र केंद्रांत असून लग्नेश पापयुक्त आपोक्लीम ३।६।९।१२ स्थानांत असेल व जर जन्म संध्याकाळचा असेल तर तो मनुष्य ३६ वर्षे जगतो ॥ १८ ॥

लग्नस्थिते वासरनायके तु पापान्तरे शत्रुगते विहीने ॥
षट्त्रिंशदंतं परमायुरस्य शुभैर्न दृष्टे सति सत्यमेतत् ॥ १९ ॥
भूसूनुचन्द्रौ तनुगौ शुभास्तु केन्द्राष्टमस्था न भवेयुरत्र ॥
जातो यदा मान्युदये शिशुःस्यात्षट्त्रिंशकेब्दे निधनं प्रयाति ॥ २० ॥

अर्थः—लग्नी सूर्य शत्रु राशीचा निर्बल आणि पापग्रहाचे कर्तरीमध्ये असेल, शुभ ग्रह कोणी पाहत नसतील तर त्या माणसाचें परमायु ३६ वर्षे असतें ॥ १९ ॥ लग्नांत चंद्रमंगळ असून शुभग्रह केंद्र किंवा अष्टम स्थानांत नसतील व लग्नांत केतु उदय पावत असेल तर ३६ वे वर्षी मृत्यु येतो.

अनिष्ट मंगळ व बहुभार्यायोग.

वधुवरांच्या पत्रिका जुळविण्याचे पूर्वी प्रथमतः त्या मुलास अगर मुलीस मंगळ आहे किंवा नाहीं याचा विचार करून नंतर पुढील घटित जुळविण्याची चाल आज आपणांत फार प्रबळ व रूढ आहे. हा मंगळ पहाण्याचा प्रकार केव्हां पासून प्रचारांत आला याबद्दल कांहींच माहिती उपलब्ध नाहीं. कित्येकांचे मतें मंगळ पहाण्याची चाल प्रथम माळव्यांत होती

व तेथेंच मंगळाचा दोष मानावा व इतर देशांत मानण्याचें कारण नाहीं. हल्लींच्या अनुमानानें केलेल्या स्थूल कुंडलीवरून मंगळ पाहाण्याच्या पद्धती मुळें कित्येक आईबापास विनाकारण मंगळाचा ताप सोसावा लागत आहे. नुसत्या ह्या चालू असलेल्या मंगळ पहाण्याचे रीतीवर अवलंबून राहणें फार धोक्याचें आहे असें अनुभवास येत आहे.


पुरुषाचे कुंडलींत मंगळ असला तर तो वधूला मारक असतो; ह्मणूनच ज्या वधूस मंगळ असतो ती पसंत करण्यांत येते; कारण तिचे कुंडलींतला मंगळ वरास मारक असतो. ह्याप्रमाणें एकमेकांस मारक असलेले योग निष्फळ होतात असें शास्त्रकारांचें मत दिसतें.

सर्व ग्रहांत मंगळ हा अति क्रूर आहे व त्याचे परिणाम फारच कडक व हानिकर असतात. मंगळाच्या धर्माकडे पाहिलें असतां, जळणें, आगलागणें, रक्तपात होणें, आकस्मिक संकटें प्राप्त होणें, लढाया वगैरे असून सर्वग्रहांत नाश करण्याचें कामांत मंगळ श्रेष्ठतम असून हा ग्रह हर्शल (प्रजापति) या ग्रहाचे खालोखाल आकस्मिक संकटें उत्पन्न करणारा आहे. ह्मणूनच आपल्या पूर्वजांनीं मंगळाचा विचार जास्त करण्यास सांगितलें असावें.

मंगळ कसा पहावा.

लग्ने व्ययेच पाताले जामित्रेचाष्टमे कुजे ॥
कन्या हरति भर्तारं भर्ता हरति कन्यकाम् ॥ १ ॥

अर्थ—लग्न, द्वादश, चतुर्थ, सप्तम, अष्टम ह्या स्थानांपैकीं एखाद्या स्थानांत मंगळ कन्येच्या कुंडलींत असला तर तो पति मारक असतो व



पुरुषाचे कुंडलींत स्त्री मारक असतो. बाजूस मांडिलेली कुंडली पहा. त्या कुंडलींत जेथें मं. हें अक्षर आहे तेथें मंगळ असतां त्या कन्येस अगर वरास मंगळ आहे असें ह्मणतात.

पुष्कळ विद्वान् ज्योतिर्विदांचे मतें, मंगळ सप्तमाधिपतीच्या १।४।७। ८।१२ या स्थानांत असला तरी ही मंगळ मानावा असें आहे व तें कांहीं अंशीं खरें आहे. म्हणून मंगळ पहातांना ही गोष्ट अवश्य विचारांत घ्यावी.

वधुवरांच्या पत्रिका जुळवितांना नुसत्या मंगळाचा विचार करूं नये तर इतर दुसऱ्या पापग्रहांचाही विचार करावा पापग्रह, लग्न, द्वितीय, चतुर्थ, सप्तम, अष्टम व द्वादशस्थानी असतां विवाहसुखांत अडथळा किंवा संकटें उत्पन्न करितात. पापग्रहांचा विचार बहुभार्या योगांमध्यें केलेला आहे तो पुढें येईलच. आतां मंगळ किंवा पापग्रह १।२।४।७।८।१२ या स्थानांत असतां वाईट मानिला आहे त्याचा विचार करूं.

साधारणपणें लग्नीं कोणताही पापग्रह उदित असलेला, चांगला नाहीं. कारण तो आयुष्याची हानी करितो. लग्नीं मंगळ असतां सप्तम स्थानावर पूर्ण दृष्टि येते व त्यामुळें तो विवाह सुखांत अडथळा आणतो. लग्नीं मंगळ असतां स्वभाव तापट असतो व त्या माणसास अपघात फार होतात.

कुंडलींत चतुर्थस्थान गृहसुख, ऐश्वर्यसुख इत्यादि गोष्टी दर्शवितें व या स्थानाचा स्त्रियांचे कुंडलींत गर्भोत्पादक स्थानांशीं कांहीं संबध आहे. स्त्रियांचे कुंडलींत चतुर्थ स्थानांतील मंगळ वंध्यत्वाचा दोष उत्पन्न करितो व आर्यपद्धती प्रमाणेंही तो सप्तम स्थानास पूर्णदृष्टीनें पाहून त्या स्थानाचा नाश करितो.

सप्तम स्थानावर पतिपत्नी सौख्याचा विचार होतो म्हणून या स्थानांत असलेले पापग्रह वधूस अगर वरास मारक असतात किंवा विवाहसुखांत अडचणी दर्शवितात. पापग्रहांत हर्शल व मंगळ हे फार भयंकर हानि करणारे ग्रह आहेत. पुरुषाचे कुंडलींत सप्तमांत असलेला मंगळ त्याची स्त्री भांडखोर व कजाग दर्शवितो. म्हणून स्त्रीचे कुंडली पेक्षां पुरुषाचे कुंडलींत सप्तमांतील मंगळ अति वाईट जाणावा कारण त्या पुरुषास गृहसौख्य फार थोडें मिळतें.

अष्टमस्थान हें गुह्येंद्रियांचें दर्शक असून ह्या स्थानावर मृत्यूचा विचार करितात. ह्या स्थानांत मंगळ किंवा हर्शल नसावा. कारण ज्यांचे कुंडलींत हे ग्रह या स्थानांत असतात त्यांस आकस्मिक मृत्यु येण्याचा जास्त संभव असतो. स्त्रियांचे कुंडलींत मंगळ या स्थानांत चांगला नाहीं कारण त्यामुळें वंध्यत्वाचा दोष प्राप्त होऊन गर्भाशयाचे विकार होण्याचा जास्त संभव असतो. अष्टम स्थान हें सप्तमस्थानापासून द्वितीयस्थान असल्यामुळें कुटुंब सौख्याचा विचार या स्थानावरून होतो ह्मणून या स्थानांत मंगळ चांगला नाहीं.

द्वादश स्थानांतील पापग्रह धाडशी व अचाट कामें करण्याकडे मनाची प्रवृत्ति करितात. स्त्रियांचे कुंडलींतलि या स्थानांतील पापग्रह, त्यांचा दुष्ट स्वभाव असण्यास बरेच कारणीभूत असतात. द्वादशस्थानांतील मंगळ पूर्ण दृष्टीनें सप्तम स्थानास पहातो. ह्या स्थानाचा स्त्रियांचे कुंडलींत आणखी एक विशेष संबंध आढळतो. स्त्रिया बाळंत झाल्यावर त्यांस साधारणपणें पुन्हा शक्ति प्राप्त होण्यास तीन महिने विश्रांति लागते. ह्या स्थानाचा वरील स्थितीशीं जास्त संबंध आहे. ज्या स्त्रियांचे कुंडलींत द्वादश स्थानांत पापग्रह असतात त्यांस बाळंत झाल्यानंतर जो शक्तिपात होतो व त्यामुळें आलेली आंगांतील क्षीणता लवकर जात नाहीं व कित्येक स्त्रियांस कांहीं कायमचे विकारही जडतात. ह्मणून या स्थानांत असलेला मंगळ फार अनिष्ट असतो.

बहु भार्यायोग.

—:०:—

एक स्त्री मेल्यानंतर दुसरा विवाह होणें, ह्याप्रमाणें जे एकापेक्षां अनेक विवाह होतात त्याबद्दल प्राचीन ग्रंथकाराचें असें मत आहे—

कलत्रेशे बहुगुणे तुङ्गचक्रादिहेतुभिः ॥
बहुभार्यं नरंविद्याच्छत्रुनीचास्तगेषुच ॥ १ ॥

अर्थ—सप्तम स्थानाचा स्वामी 'उच्च' 'वक्र' इत्यादि गुणांनीं युक्त असेल किंवा तो 'शत्रुस्थानाचा' 'नीच' किंवा 'अस्तंगत' असेल तर त्याचे—स्त्रिया मरण पावल्यामुळें—अनेक विवाह होतात.

भार्याद्वयं वदेत्तत्र लग्नेशे नाशराशिगे ॥
कलत्रे पापसंयुक्ते कुटुम्बेशे तथा विधे ॥ १ ॥
शन्यारफणिसंयुक्ते कलत्रेशो यदा भवेत् ॥
क्रूर षष्ट्यंशके वापि कलत्रमरणं वदेत् ॥ २ ॥

अर्थः—लग्नेश द्वादशस्थानांत, सप्तम व कुटुंब स्थानांत पापग्रह असेल, तर दोन स्त्रिया होतात. (पहिली मरून दुसरी होणें) ॥ १ ॥ जर सप्तमेश, शनि, मंगळ किंवा राहुयुक्त असेल अथवा क्रूर षष्टयंशामध्यें असेल तर प्रथम स्त्रीचा नाश होतो ॥ २ ॥

कलत्रे वा कुटुम्बे वा पापदृग्योगसंभवे ॥
तदीशे बलहीने तु कलत्रांतरभाग्भवेत् ॥ १ ॥
सप्तमे चाष्टमे पापे व्यये भूसुतसंयुते ॥
अदृश्ये यदि नाथेन कलत्रांतरभाग्भवेत् ॥ २ ॥

अर्थः—सप्तम अथवा द्वितीय स्थानावर पापग्रहांची दृष्टी असून त्यां भावांचे स्वामी निर्बल असतील तर प्रथम स्त्रीचा मृत्यु होतो ॥ १ ॥

सप्तम व अष्टम या भावां मध्यें पापग्रह असून द्वादश स्थानांत मंगळ असेल व सप्तमेश आपले स्थानास पहात नसेल तर दोन स्त्रिया होतात.

वित्ते पापबहुत्वे तु कलत्रे वा तथाविधे ॥
तदीशे पापसंदृष्टे कलत्रत्रयभाग्भवेत् ॥ १ ॥
लग्ने कुटुंबे दारे वा पापखेचरसंयुते ॥
दारेशे नीचमूढादौ कलत्रयभाग्भवेत् ॥ २ ॥

अर्थः—धनस्थानांत पुष्कळ पापग्रह व सप्तम स्थानांतही तसेच पापग्रह असतील व त्यांचे स्वामी पापग्रह युक्त असतील तर पुष्कळ स्त्रिया

होतात ॥१॥ लग्न, द्वितीय व सप्तम भावांत पापग्रह असतील व सप्तमेश नीच, अस्तंगत वगैरे असेल तर तीन स्त्रिया होतात ॥ २ ॥

वरील विवेचना वरून ध्यानांत येईल कीं, लग्न, द्वितीय, सप्तम, अष्टम व द्वादश ह्या स्थानांत असलेले पापग्रह स्त्री मारक असतात. म्हणून वराचे कुंडलींत खाली दिलेले योग असतां ते स्त्रीनाश दर्शवितात व वधूचे कुंडलींत असतां ते वैधव्यकारक होतात किंवा विवाह सुखांत अडचणी उत्पन्न करितात.

(१) लग्न, द्वितीय, अष्टम व द्वादश स्थानांत पापग्रह.
(२) द्वितीय स्थान पापग्रहयुक्त किंवा दृष्ट.
(३) सप्तम स्थान पापग्रहयुक्त किंवा दृष्ट.
(४) सप्तमाधिपति पापग्रहयुक्त किंवा दृष्ट.
(५) कुटुंबस्थानचा अधिपति पापग्रहयुक्त किंवा दृष्ट.
(६) शुक्र पापयुक्त किंवा त्याचे सप्तमांत पापग्रह.
(७) वराचे कुंडलींत चंद्र पापग्रहयुक्त किंवा दृष्ट व वधूचे कुंडलींत रवि पापग्रहयुक्त किंवा दृष्ट.

वरील योग असून स्त्रीसुखाचे कारक ग्रह–शुक्र व चंद्र–हे जेव्हां युग्मराशींत–मिथुन, धन व मीन–असतात, किंवा युग्म राशि सप्तम भावारंभीं उदित असते व चंद्र किंवा शुक्र हे प्रसवराशींत–कर्क, वृश्चिक व मीन–असतात तेव्हां खात्रीनें दोन विवाह होतात.

स्त्रियांचे कुंडलींत वर सांगितल्याप्रमाणेंच विचार करावा. जेव्हां त्यांचे कुंडलींत वर सांगितलेले योग असतात तेंव्हां त्यांस वैधव्यदोष प्राप्त होतो. स्त्रियांचे कुंडलीत भर्तृसुखासंबंधीं विचार करतांना, सप्तमेश, रवि व मंगळ यांचा जास्त विचार करावा. व पुरुषाचे कुंडलींत स्त्रीसुखाचा विचार कर्तव्य असतां चंद्र, शुक्र व सप्तमेश यांचा जास्त विचार करावा. शुक्र हा ग्रह विषयसुखाचा कारक असल्यामुळें त्याचा पुरुषांचे व स्त्रियांचे कुंडलींत जास्त विचार करणें जरूर आहे. स्त्रियांचे कुंडलींत मंगळ बलहीन असेल

तर विवाह जुळवितांना फार त्रास पडतो असा अनुभव आहे. सारांश ज्या वराचे किंवा वधूचे कुंडलींत वर सांगितल्याप्रमाणें मारक योग असतील त्यांचा विवाह ज्या वधूचे किंवा वराचे कुंडलींत तसेच मारक योग असतील त्याचेच बरोबर लग्न ठरवावें. व हें ठरवितांना कोणाच्या कुंडलींतील योग जास्त मारक आहेत यांचा पूर्ण विचार करावा. नुसते ३६ गुण मिळत असले तरी विवाह करणें मुळींच श्रेयस्कर नाहीं.

वधुवर ज्ञान.

प्रत्येक आईबापास आपल्या मुलीला नवरा कसा मिळेल ह्याची पुष्कळ काळजी वाटते. व ते जोशाकडे गेले असतां त्यास तसेच प्रश्न विचारतात. त्याचप्रमाणें आपलें लग्न केव्हां होईल, आपली भावी वधु कशी असेल तिचे अंगीं कोणते गुण असतील, तिचा स्वभाव कसा असेल, तिजला संतती कोणत्या प्रकारची होईल वगैरे वगैरे गोष्टी जाणण्याची उत्कट इच्छा पुरुषांमध्यें सुद्धां आढळते; व ही इच्छा ज्योतिषशास्त्रच पूर्ण करतें. परंतु ह्या गोष्टी जाणण्यास ह्या शास्त्राचा बराच व्यासंग व अनुभवही पाहिजे. अनुभवाखेरीज अचुक विधानें करतां येणें शक्य नाहीं.

सप्तम स्थानांतील ग्रहविचार.

पुरुषाचे कुंडलींत सप्तमांत सूर्य असला तर त्याची स्त्री मानी व उदात्त विचारांची असते. व त्या पुरुषाची लग्नानंतर भरभराट होते. स्त्रियांचे कुंडलींत ह्या स्थानाचा रवि फार महत्वाचा मानित नाहींत. परंतु लग्न उशिरानें किंवा बिजवराशीं होण्याचा संभव असतो व लग्नापासून चांगलें सुख मिळतें. हा ग्रह पुष्कळ पीडित असला तर विवाह फार उशिरानें होतो किंवा लग्न जुळवितांना अत्यंत भानगडी व त्रास उत्पन्न होतो. परंतु

सूर्य सप्तमांत असून चंद्राबरोबर किंवा गुरूबरोबर शुभदृष्टियोग करीत असेल तर गृहसौख्य उत्तम प्रकारचें मिळतें.

(२) चंद्रः—स्त्रीचे कुंडलीत असतां लग्न झाल्यावर विलक्षण गोष्टी घडतात व नवऱ्याची प्रीतिसंबंधीं वागणूक धरसोडीची असते. जर चंद्र शुभ दृष्ट असेल तर तो शुभ फळें उत्पन्न करतो.

पुरुषाचे कुंडलींत चंद्र जर पीडित असेल तर स्त्रीचा मृत्यु लवकर होण्याचा संभव असतो. चंद्र सप्तमांत वृषभ, कर्क, धन, कुंभ व मीन या राशीचा असून शनीबरोबर शुभदृष्टियोग करीत असेल तर नवरा अगर स्त्री उद्योगी व दक्ष असते.

(३) मंगळः—भांडणें व तंटे दर्शवितो. व त्यामुळें विवाहसुखांत पुष्कळ व्यत्यय येतो. पुरुषाचे कुंडलींत सप्तमांत मंगळ फारच वाईट; कारण त्याची स्त्री भांडखोर, घातकी, ताब्यांत न राहणारी अशी असते. स्त्रीचे कुंडलींतील मंगळ जरी वरप्रमाणेंच वाईट फळें देतो तरी तीं तितकीं भयंकर नसतात. कारण पुरुषाचे कुंडलींत सप्तमांत मंगळ असतां त्याची स्त्री अति धाडशी व जणूं काय त्राटिकाच असते; व स्त्रीचे कुंडलींतील मंगळ तिचा नवरा उलाढाली करणारा व धाडशी असा दर्शवितो.

(५) गुरुः—स्त्री सुस्वभावाची व पतिनिष्ठ अशी असते. लग्नापासून चांगलें सुख व फायदा होतो. स्त्रीचे कुंडलींत असतां बिजवर नवरा मिळतो किंवा वयानें मोठा व अति धार्मिक असा असतो. व त्याची सांपत्तिक वगैरे स्थिति चांगल्या प्रकारची असते. व त्या स्त्रीस त्या लग्नसंबंधामुळें चार लोकांत सहज मानमान्यता मिळते. जर गुरू बलवान व शुभ दृष्ट असेल तर विवाहानंतर फार चांगल्या प्रकारचा भाग्योदय होतो.

(४) बुधः—पुरुषाचे कुंडलींत बुध असतां त्याची वधु हुशार, चणचणीत व उद्योगी असते. हा ग्रह पीडित असेल तर भांडणें, तंटे होतात व स्त्री फार तोंडाळ असते. व ती वयानें लहान असून नात्यांतील अस-

ण्याचा संभव असतो. बुध हा ग्रह दुसऱ्या ग्रहाचे गुणधर्माप्रमाणें वागणारा असल्या कारणानें ज्या ग्रहाशीं शुभ अगर अशुभ दृष्टी करीत असेल त्याप्रमाणें फळें उत्पन्न करतो.

(६) शुक्रः—स्त्री अगर भर्ता फारच सुंदर असतो. व लग्नापासून पुष्कळ सुख मिळतें. ह्या ग्रहास पापदृष्टियोग झाले असले तर लग्न जुळवितांना फार अडचणी प्राप्त होतात. शुक्र बलवान असतां लग्न झाल्यावर भाग्योदय होतो. सप्तमांत शुक्र वृश्चिक अगर मकर राशीचा असेल तर स्त्री अगर भर्ता चांगल्या प्रकारचा असेल असें सांगवत नाहीं.

शनिः—आपल्या भर्त्यावर प्रीति करणें हें आपलें कर्तव्यकर्मच आहे असें मानणारी, सत्यनिष्ठ, हुषार, स्थिरस्वभावाची व उद्योगी अशी स्त्री असते. स्त्रीचे कुंडलींत सप्तमांत शनि असतां नवरा बिजवर किंवा वयानें मोठा असा मिळतो. शनि चंद्राबरोबर अशुभ दृष्टियोग करील तर गृहसुख चांगलें मिळणार नाहीं.

हर्शलः—लग्न अति विचित्र तऱ्हेनें जुळतें. कित्येक प्रसंगीं लग्नें जुळवितांना फार घाई झालेली आढळते. वधु अगर वर अति चतुर, कल्पक, हुषार व तऱ्हेवाईक असण्याचा संभव असतो. हर्शल सप्तमांत असतां तो कोणत्या प्रकारचीं फळें उत्पन्न करील हें ठरविणें अत्यंत कठीण आहे. व हें ठरवितांना एकंदर कुंडलीचा नीट विचार केला पाहिजे.

नेपच्यूनः—लग्न चमत्कारिक तऱ्हेनें घडतें. कित्येक प्रसंगीं पांगळ्या, मुक्या किंवा विकलांग मनुष्याबरोबर विवाह संबंध घडतो. ह्या स्थानांत नेपच्यून असतां लग्न कोणाबरोबर होईल ह्या गोष्टीचा विचार फार जपून करावा. नेपच्यून पापदृष्ट असेल तर मात्र वाईट फळें खात्रीनें मिळतात. पती किंवा पत्नीस वेड लागण्याचाही संभव असतो. ह्याप्रमाणें सप्तमांत कोणते ग्रह असतां काय फळें उत्पन्न करतात याबद्दल थोडक्यांत विवेचन झालें. पाश्चात्य ग्रंथकारांनीं वधु अगर वर कसा असेल याबद्दल जे नियम सांगितले आहेत ते खालीं दिलेच आहेत. पाश्चात्य लोकांतील रीतीभाती

व आपल्या रीतीभाती यांत फारच फरक आहे करितां खालील माहितीचा विचार फार जपून करावा.

स्त्रीचा विचार करणें असतां पुरुषाचे कुंडलींत चंद्र, शुक्र व सप्तमाधिपती यांचा विचार केला पाहिजे. व पतीचा विचार कर्तव्य असतां स्त्रीचे कुंडलींत सूर्य, शुक्र व सप्तमेश यांचा विचार करावा. स्त्रियांचे कुंडलींत रवि प्रथम ज्या ग्रहाबरोबर दृष्टियोग करण्यास जात असेल त्याच्या स्वभावानुरूप मनुष्याबरोबर बहुतकरून लग्नसंबंध घडतो; म्हणून तो ग्रह ज्या राशींत असतो त्या राशीच्या व ग्रहाच्या धर्माप्रमाणें पतीचा स्वभाव असतो. वरील दृष्टियोग जर वाईट असेल तर तसल्या माणसाबरोबर लग्नसंबंध न करणें बरें.

पुरुषाचे कुंडलींत स्त्रीचा विचार कर्तव्य असतां चंद्र ज्या ग्रहाबरोबर प्रथम दृष्टियोग करण्यास जात असेल त्यावरून त्याचे स्त्रीचा स्वभाव वगैरे जाणावा. परंतु सप्तमांत ग्रह असतां त्याचा विचार पहिल्यानें करावा. त्याचप्रमाणें सप्तमभावारंभीं जी राशि उदित असेल तिचाही विचार करावा व त्याप्रमाणें वधूचा स्वभाव व वर्ण वगैरे जाणावे.

दृष्टियोग शुभ होत असतील तर विवाहा पासून सुख प्राप्त होतें. परंतु अशुभ दृष्टियोग होत असले तर वाईट फळें मिळतात. रवि अथवा चंद्र हे ज्या ग्रहाबरोबर दृष्टियोग करण्यास जात असतील त्या ग्रहाच्या गुण धर्माचा पूर्ण विचार केला पाहिजे; कारण जर रवि अगर चंद्र शुभ ग्रहा बरोबर शुभदृष्टि योग करण्यास जात असतील अथवा तो ग्रह चांगल्या स्थानांत असून शुभग्रहदृष्ट असेल तर लग्नापासून फार उत्तम प्रकारचें सुख मिळतें. परंतु जेव्हां पाप ग्रहाबरोबर अशुभ दृष्टियोग होत असेल किंवा ग्रहाचे धर्म व दृष्टियोग हे एकमेकां विरुद्ध असतील तेव्हां लग्नापासून त्रास व संताप प्राप्त होऊन दोघांची ताटातूट होते. उदाहरणार्थः—चंद्र हा शनि, मंगळ किंवा हर्शल बरोबर पूर्ण दृष्टियोग (१८०) करण्यास जात

असेल, किंवा चंद्र हा शनी बरोबर शुभदृष्टि योग करण्यास जात असेल किंवा चंद्र हा गुरूबरोबर वाईट दृष्टियोग करण्यास जात असेल तेव्हां विवाहापासून सुख व दुःख यांचे मिश्रणाचा अनुभव मिळतो. कित्येक वेळीं चंद्र हा ग्रहाबरोबर शुभदृष्टियोग करण्यास जात असतो परंतु त्याच वेळेस सप्तमांत एखादा पापग्रह असतो अशा वेळीं विवाहापासून प्रथमतः सुख चांगले मिळतें व स्त्री मना जोगी असते; परंतु लवकरच भांडणें वगैरे होण्यास सुरवात होऊन शेवट वाईट घडतो.

चंद्र-रवीबरोबर प्रथम दृष्टियोग करण्यास जात असेल तर स्त्री हुषार, उदार, थोर मनाची, सरळमार्गाचें अवलंबन करणारी, दृढनिश्चयी व पोकळ गर्व बाळगणारी अशी मिळेल.

चंद्र-मंगळः-स्त्री दांडगी, शिरजोर, बेपर्वा व क्रोधी अशी मिळेल.

चंद्र-बुधः-वयानें लहान, हुषार, सुज्ञ, शिकलेली, चाणाक्ष, अती बोलकी अशी स्त्री मिळते.

चंद्र-गुरुः-न्यायी, सत्यप्रिय, आनंदी, मायाळू व सुरेख अशी भार्या मिळते.

चंद्र-शुक्रः-सौंदर्यवती, मायाळू, सर्वगुण संपन्न भार्या मिळते.

चंद्र-शनिः-गंभीर, कर्तव्य दक्ष व काटकसरीनें वागणारी अशी भार्या मिळते.

चंद्र-हर्शलः-विचित्र स्वभावाची, कोणाचें न ऐकणारी व उतावीळ अशी असते.

चंद्र-नेपच्यूनः—हुषार, विचित्र, कल्पक व शोधक अशी भार्या मिळते.

स्त्रियांचे कुंडलींत रवि हा प्रथम ज्या ग्रहाबरोबर दृष्टियोग करण्यास जात असेल त्यावरून वरील प्रमाणें फळें जाणावी.

वरील सर्व फळें रवि अगर चंद्र इतर ग्रहांबरोबर ज्या तऱ्हेनें दृष्टियोग करीत असतील त्यावर अवलंबून आहेत. जर दृष्टियोग शुभ असेल तर वरलि प्रमाणें शुभ फळें मिळतात. परंतु वाईट दृष्टियोग असतां ह्याचे उलट प्रकार आढळतील.

सप्तमांत शुभग्रह असतां वधु अगर वर उत्तम मिळतो. परंतु त्याच वेळेस अशुभ दृष्टियोग चंद्र अगर रवि करीत असेल तर लग्न चांगल्या वधूबरोबर अगर वरा बरोबर होतें; परंतु लवकरच संसारांत विघ्नें येतात.

मंगळ सप्तमांत असून शनीबरोबर दृष्टियोग करीत असेल किंवा मंगळ शनीनें दृष्ट असून रवीबरोबर दृष्टियोग करण्यास जात असेल किंवा दोघांपैकीं एक सप्तमांत व दुसरा पंचमांत असेल तर बिजवर नवरा मिळतो. रवि पश्चिमषट्कांत पीडित असतां बिजवर नवरा मिळतो.

आतां आपण वधू अगर वर कोठील असेल ह्याकडे वळूं. वधू अगर वर अमक्याच ठिकाणचीं आहेत वगैरे गोष्टी सांगतां येणें शक्य दिसत नाहीं. तथापि वधू अगर वर हीं जेथें जन्मलीं असतील किंवा त्यांचें आईबाप किंवा पालक हे जेथें राहत असतील त्या स्थळा पासून अगदीं लांब किंवा जवळ किंवा कोणत्या दिशेला वधू अगर वर मिळेल ह्याबद्दल अटकळ करणें शक्य आहे.

जन्म कुंडलींतील रवि (स्त्रीची कुंडली असतां) किंवा चंद्र (पुरुषाची कुंडली असतां) शुक्र व सप्तमेश ह्यावरून वर अगर वधू कोठील असतील हें ठरवितां येतें. जर रवि, चंद्र, शुक्र व सप्तमेश हे लग्नापासून सप्तम स्थानापर्यंतच्या भागांत असतील तर वधू अगर वर फार लांबचा असणार नाहीं. परंतु तेच जर उदितगोलार्धांत असतील व त्यांतून दशम किंवा नवम स्थानांत असतील तर वधू अगर वर फार दूर ठिकाणचा असतो. रवि, चंद्र, शुक्र व सप्तमेश हे चतुर्थ किंवा तृतीय स्थानांत असतां त्याच शहरांतील किंवा गांवांतील असतो; धन, पंचम किंवा षष्ट या स्थानांत असतां वीस कोसाचे आसपासचे टप्प्यांतील असतो. लग्नांत किंवा सप्तमांत असतां

एक जिल्हा सोडून दुसऱ्या जिल्ह्यांत असलेल्याशीं शरीरसंबंध घडतो. द्वादश किंवा अष्टम स्थानांत असतां ४०।५० कोसांचे आसपासचे स्थळ मिळतें; व एकादशस्थानांत असतां ६०।७० कोसाचे आसपासचें स्थळ मिळतें.

त्याच प्रमाणें रवि अगर चंद्र ज्या ग्रहाबरोबर दृष्टियोग करण्यास जात असेल तो ग्रह ज्या राशींत व ज्या स्थानांत व ज्या स्थानाचा मालक असेल त्या स्थानांचाही थोडा बहुत संबंध असतो. उदाहरणार्थः—चंद्र तृतीय स्थानांतील गुरूबरोबर ६० अं. अथवा त्रिराश्यंतर दृष्टियोग करण्यास जात असेल तर शरीर संबध बहुतेक शेजाऱ्यांतच घडतो; किंवा तो जुळवून आणण्या करितां शेजारी खटपट करतो. निदान पत्रव्यवहारानें तो जुळतो. एकादश स्थानाचा संबंध असतां मित्रांत शरीरसंबंध घडतो किंवा मित्रामुळें तो जुळतो. ह्याप्रमाणें इतर स्थानांचाही विचार करावा.

प्रीतियोग.

वधुवरांच्या किंवा दोन जिवश्च कंठश्च मित्रांच्या कुंडल्या घेतल्या असतां त्यांत एकविशिष्ट प्रकारचें साम्य आढळतें. ह्यासच आपण प्रीतियोग असें म्हणूं. वधुवरांच्या कुंडलींत प्रीतियोग जितके जास्त असतील तितके उत्तम. या ठिकाणीं वधूच्या कुंडलिवरून वराच्या किंवा वराच्या कुंडलीवरून वधूच्या कुंडलींतील ग्रह सांगण्याचा विचार मुळींच केलेला नाहीं. परंतु विवाहित होणाऱ्या दंपत्यांत प्रीतियोग आहेत किंवा नाहींत व ते कसे असावे ह्याबद्दल विवेचन केलें आहे. आमच्यांत ज्याप्रमाणें गुणमेलन पाहण्याची चाल आहे त्याच प्रमाणें प्रीतियोग पाहण्याची चाल जारीनें सुरू झाली पाहिजे. वधुवर कुंडल्यांत खालील प्रमाणें प्रीतियोग असावेतः—

(१). वधूचें लग्न वराच्या कुंडलीतील जन्मलग्नापासून १।३।५ ७।९।११ ह्या राशींपैकीं असावें.

(२) वराच्या कुंडलींत चंद्र ज्या राशींत असेल त्याच राशीचें किंवा त्या राशीपासून ३।५।७।९।११ ह्यांपैकीं लग्न असावें.

(३) वराचा शुक्र ज्या राशींत असतो त्याच राशीचें किंवा त्या राशीपासून ३।५।७।९।११ ह्यांपैकीं लग्न असावें.

(४) वराचा शुक्र ज्या राशीत असतो त्याच राशींत वधूचा रवि, चंद्र, मंगळ ह्यांपैकीं कोणी तरी असावा किंवा ते ग्रह शुक्राचे सप्तमांत किंवा ३।५।९।११ ह्या स्थानीं असावे.

(५) वराचा चंद्र ज्या राशींत असेल त्याच राशींत वधूचा शुक्र किंवा सप्तमाधिपती असावा किंवा चंद्राचे ३।५।७।९।११ ह्या स्थानांत शुक्र किंवा सप्तमाधिपती असावा.

(६) वराचा चंद्र व वधूचा रवि यांची युती किंवा तृतीयैकादश, नव पंचम किंवा समसप्तक योग असावा.

(७) वधुवरांच्या चंद्रांत शुभदृष्टियोग असावा.

(८) वराचे कुंटुबस्थानांतलि राशि वधूचे लग्नीं उदित असावी.

(९) वराच्या कुंडलींत ज्या स्थानांत जे ग्रह असतात तसेच त्या स्थानांत वधूच्या कुंडलीत जितके जास्त ग्रह असतील तितके चांगले.

(१०) वराचा सप्तमेश ज्या राशींत असतो त्याच राशींत वधूचा रवि, चंद्र किंवा शुक्र असावा; परंतु तो सप्तमेश पापग्रह नसावा.

(११) वराचे सप्तमेशाचे समोरील राशींत वधूचा रवि, चंद्र, शुक्र किंवा मंगळ असावा.

(१२) वराचे कुंडलींतील शुभग्रहाची–शुक्र किंवा गुरु–राशि वधूचे लग्नीं असावी; निदान त्यांची नवपंचम दृष्टि तरी असावी.

(१३) वराचे शुक्राचे कुंटुबस्थानांतील राशींत वधूचा रवि किंवा चंद्र असावा.

(१४) वराचा मंगळ किंवा हर्शल हा वधूचे शुक्राबरोबर• शुभदृष्टि-योग करित असावा.

(१५) वराचे चंद्र राशींत वधूचा सूर्य व वधूचे सूर्य राशींत वराचा चंद्र असावा.

ह्याप्रमाणें आणखींही पुष्कळ प्रीतियोग असतील. परंतु मुख्य योगांचाच वर विचार केला आहे.

प्रीतियोग ज्याप्रमाणें वराचे कुंडली वरून पाहण्यास सांगितले आहेत त्याचप्रमाणें वधूचे कुंडली वरूनही पाहावे. वधुवरांच्या कुंडल्या जमवितें वेळीं वरील सर्व योग एकाच कुंडलींत आढळणार नाहींत. गुणमेलन करून पत्रिका पाहतांना वरील प्रीतियोगांचा प्रथम विचार करावा. प्रीतियोग जास्त असून गुण कमी मिळत असले तरी शरीरसंबंध करण्यास मुळींच हरकत नाहीं. परंतु गुण भरपूर मिळून प्रीतियोग नसतील तर विवाह न जमविणें फार उत्तम अशी आमची दृढ समजूत आहे.

संतति व संपत्ति.

संतति.

पुढें होणाऱ्या भावी प्रजेचें आयुष्य पुष्कळ अंशीं आईबापांचे जन्मकालिन कुंडल्यांवर अवलंबून असतें. हल्लीं लहान मुलांची मृत्यु संख्या दिवसें दिवस वाढत जात आहे व जीं असंख्य रोगग्रस्त अशक्त बालकें आज मृत्युमुखीं पडत आहेत त्याचें कारण वधुवरांच्या संतती सुखा बद्दल कोणी विचार करीत नाहींत, हें होय. बीज निर्जीव असून भूमि किती जरी चांगली असली तरी रोपे चांगले जोमदार वाढत नाहींत. त्याचप्रमाणें बीज चांगलें असून भूमि निःसत्व असली तरी देखील रोपे जोमानें वाढत नाहींत

हें आपल्या दररोज पहाण्यांत येत आहे. तेंच वधुवरांच्या कुंडल्यांत बऱ्याच अंशानें लागू पडतें.

संतती संबंधानें विचार कर्तव्य असतां, पंचम व एकादशस्थान ह्यांचा मुख्यत्वें करून विचार केला पाहिजे. जर ह्या दोन भावारंभीं प्रसव राशि—कर्क, वृश्चिक, मीन—किंवा स्त्रीराशि—वृषभ, कर्क, वृश्चिक, मकर व मीन—उदय पावत असतील तर संतति होते. ग्रहांत चंद्र, शुक्र व गुरु हे संतती देतात व ते पंचमांत असतां संततीस चांगले मानतात. परंतु सूर्य, मंगळ व हर्शल संतती देत नाहींत व पंचमांत असतां संततीचा नाश करितात. साधारणपणें पंचमभावारंभीं मेष राशि उदीत असेल तर संतती होत नाहीं. झालीच तर एक दोन मुलें होतात. त्याच प्रमाणें सिंह व कुंभ राशी असतां संतती होत नाहीं. वृषभ, तूळ व धन असतां ३।४ मुलें होतात; मिथुन, कन्या व मकर २।३ होतात; कर्क व वृश्चिक ५।६ होतात; व मीन राशि असतां ७।८ मुलें होतात. हें अनुमान पंचमांत किंवा एकादश स्थानांत कोणी ग्रह नसतां बरेंच अनुभवास येतें. पुरुषाचे कुंडलींत चंद्र संतती होईल किंवा नाहीं हें दर्शवितो व स्त्रियांचे कुंडलींत त्यांचे गर्भाशय गर्भ राहण्यास योग्य आहेत किंवा नाहीं हें दर्शवितो. ह्मणून संततीचा विचार करितांना चंद्राचा जास्त विचार करावा. चंद्र बलवान असून शुभग्रह दृष्ट असेल व पंचमांत कोणी पापग्रह नसेल तर संतती चांगली निपजते.

संपत्ति.

मानवीप्राण्याच्या सांपत्तिक स्थिती बद्दल जन्म कालिन कुंडलीवरून जितकें अचुक अनुमान करितां येतें तितकें त्यांच्या माहीत असलेल्या स्थितीवरून करितां येत नाहीं. आपण व्यवहारांत पाहिलें असतां, कित्येकांचें नशीब त्यांचे मित्रांमुळें, कित्येकांचें त्यांच्या सासऱ्यामुळें तर कित्येकांचें भागिदारामुळें चांगलें उदयास आलेलें आढळेल. एकमेकांच्या कुंडलींतील ग्रहस्थितीचा परिणाम एक-

मेकांवर होत असतो म्हणूनच लग्न जुळवितांना सांपत्तिक स्थितीचा अवश्य विचार करावा.

या संबंधीं विचार कर्त्तव्य असतां, धनस्थानांत कोणते ग्रह आहेत हें पहिल्यानें पहावें. त्या ठिकाणीं गुरु किंवा शुक्र असून पीडित नसतील तर सांपत्तिक स्थिती चांगल्या प्रकारची राहते. या भावांत पापग्रह नसावा. व या स्थानांतील कोणताच ग्रह पीडित नसावा. धनस्थानांतील ग्रहांबरोबर दुसरे ग्रह पापदृष्टियोग करीत असतील तर सांपत्तिक अडचणी वारंवार येतात; त्यांत पापग्रह पापदृष्ट असतां गरिबीच पदरीं येते. धनस्थानांत पापग्रह पीडित असून तो रवि अगर चंद्र यांचे बरोबर अशुभ दृष्टियोग करीत असला तर सर्व आयुष्य दारिद्र्यांत काढावें लागतें.

गुरु किंवा शुक्र लग्नांत किंवा दशमांत उदय पावत असतील तर तें एक मोठ्या भाग्याचें लक्षण जाणावें. धनस्थानांत मंगळ असतां मनुष्य फार सढळ हातानें खर्च करतो. त्याचे अंगांत पैसे कमविण्याची चांगलीच धमक असते. पंचमांत किंवा एकादशस्थानांत शुभग्रह असून शनीबरोबर शुभदृष्टियोग करीत असतील तर वडिलोपार्जित मिळकत किंवा दुसऱ्याचा पैसा मिळतो. गुरु व शनि यांचा शुभ योग असतां वरील प्रमाणें जाणावें. अष्टमांत शुभग्रह असतां किंवा शुभदृष्टीनें युक्त दुसरे ग्रह असतां मृत्युपत्रामुळें सांपत्तिक स्थितींत भर पडते. हर्शल व गुरु यांचा शुभदृष्टियोग असेल तरीही मृत्युपत्राद्वारें मिळकतीचा लाभ होतो. अष्टमांत शुभग्रह असतां सासऱ्याकडून स्त्रीधन चांगलें मिळतें. गुरु अथवा शनि सप्तमेशा बरोबर तृतीयैकादश किंवा नवपंचम योग करीत असेल तर स्त्रीकडून पैसा मिळतो.

विवाहकाल.

जगांतील इतर राष्ट्रांकडे पाहिलें असतां विवाहकालाची मर्यादा निरनिराळी आढळेल. हा काल जातिपरत्वें, देशपरत्वें, भिन्न असी आढळेल. त्याच-

प्रमाणें प्रत्येक जातीचे विवाहाचे मुहूर्तकाल देखील निरनिराळे असलेले आढळतील. कित्येक जातींत विवाह लागेल त्यावेळीं होतात. आपले कडील सरासरी शेंदोनशें वर्षांपूर्वील स्थितीचें निरीक्षण केलें असतां व अलीकडील स्थिति लक्षांत घेतली तर या काळांत किती फेरफार झाला आहे हें ध्यानांत घेण्यासारखें आहे. हल्लीं मुलींचा विवाह सरासरी तिचे वयाचे १५ वर्षांचे आंत बहुत करून होतो व मुलांच्या विवाहाचें मान २२ ते २५ पर्यंतचें आहे. क्वचित अपवादकारक कांहीं बालविवाह ही होतात, परंतु त्यांचें प्रमाण आतां कमी होत आहे.

आपले ग्रंथांत विवाह अमक्या वर्षी होईल या संबंधानें नियम सांगितलेले कोठें आढळत नाहीत; परंतु संभवकाला संबंधानें बराच खल केलेला आढळेल. जन्मकालिन कुंडली वरून विवाहकाल लवकर आहे किंवा उशिरां आहे याचा विचार पुरुषाचे कुंडलींत चंद्र, शुक्र व सप्तमेश, व स्त्रियांचे कुंडलींत, रवि, शुक्र, सप्तमेश व मंगळ यावरून करावा. हे ग्रह जर बलवान असतील व कोणाकडून पीडित नसतील तर विवाह लवकर होतो. त्यांत विशेषतः चंद्र शुक्र किंवा रवि शुक्र हे पूर्वषट्कांत ह्मणजे दशमा पासून लग्नापर्यंत किंवा चतुर्था पासून सप्तमापर्यंतचे स्थानांत असतां विवाह लवकरच होतो. त्याचप्रमाणें प्रसवराशि—कर्क, वृश्चिक व मीन—लग्नीं किंवा सप्तमभावारंभीं किंवा पंचमभावारंभीं उदित असतील तर लग्न लवकर होतें. परंतु तेच वंध्याराशि-मिथुन, सिंह व कन्या-पंचमभावारंभीं उदित असतील तर लग्न उशिरां होतें. चंद्र पंचमांत किंवा सप्तमांत बलवान असून पुष्कळ ग्रहां बरोबर शुभदृष्टियोग करीत असेल तर लग्न लवकर होतें. पुरुषाचे कुंडलीत जर शनि, चंद्रास किंवा शुक्रास पीडा करीत असेल तर लग्न उशिरां होतें. जर चंद्र किंवा शुक्र निर्बल असून शनि बलवान असेल व वंध्याराशि, लग्न, पंचम किंवा सप्तम भावारंभीं उदय पावत असेल तर तो अविवाहित राहतो.

पुढील भावी स्थितीचीं फळें बिनचुक सांगता येतील अशी एकही सोपी पद्धत सध्यां उपलब्ध नाहीं व ज्या आहेत त्यावरून पुढील गोष्टी 'अगदी

बरोबर सांगतां येतील असें दिसत नाहीं. **पाश्चात्य ग्रंथकारानीं** यावर चांगला विचार केला आहे व त्याच्यांत रूढ असलेल्या पद्धतीनें पुढील भावी स्थितीचें वर्णन करण्यास गणिताचें ज्ञान चांगलेंच असावें लागतें. हल्लीं प्रचारांत असलेल्या **पाश्चात्य व आर्य** पद्धतींचा विचार करितां, **ज्योतिर्विद् मंडळाचे** स्थापन कर्ते व फलज्योतिषशास्त्रविशारद **कै० रा. रा. जिवनराव त्रिंबक चिटणीस** ह्यांनीं स्वतःचे कल्पनेनें शोधून काढिलेली व **इंडियन् सायक्लिक सिस्टीम** या नांवानें ज्ञात असलेली ग्रहांचे परिभ्रमणकालगणना पद्धत फारच सोपी असून फळें पण चांगलींच मिळतात असा अनुभव असल्या कारणानें तिचें विवेचन करण्याचें योजिलें आहे. **कै० रा. चिटणीस** यांच्या अकालीं मृत्यूमुळें इतर कामा बरोबरचही पद्धत अपूर्ण राहिली ! ईश्वरी इच्छा ! !

इन्डियन् सायक्लिक सिस्टीम.

ही पद्धत शोधून काढण्याचे कामीं कै. रा. चिटणीस यांनीं **मेटॉनिक पिरीअड्स** ह्या नांवानें ग्रीसमध्यें प्रसिद्ध असलेल्या ग्रहांचे वर्षसंख्येचा उपयोग केला आहे. ह्यांपैकीं कांहीं वर्षे आपल्या **बृहज्जातक** व इतर ग्रंथांत आढळतात. ग्रहांच्या परिभ्रमणकाळाचीं वर्षे स्थूलमानानें अशीं आहेतः—

रवीचीं १९ वर्षें ह्मणजे रवीस द्वादशराशींत पूर्ण फेरा करण्यास १९ वर्षें लागतात. त्याचप्रमाणें चंद्राचीं ४, मंगळाचीं १९, बुधाचीं १०, गुरुचीं १२, शुक्राचीं ८, शनीचीं ३०, राहूचीं १८, व हर्शलाचीं ८४ वर्षें याप्रमाणें ठरविलेलीं आहेत. शिवाय कुंडलींतील द्वादशस्थानें क्रमाक्रमानें वर्ष कुंडलीचीं तनुस्थानें होतात. प्रथम वर्षाचा आरंभ तनुस्थानांत, द्वितीय वर्षाचा आरंभ द्वितीय स्थानांत, तृतीय वर्षाचा आरंभ तृतीय स्थानांत याप्रमाणें क्रमानें प्रत्येक वर्षाचा आरंभ निरनिराळ्या स्थानांत होत असतो. तेराव्या वर्षीं पुन्हा आरंभ तनुस्थानांत होतो.

जेव्हां वरील परिभ्रमणकालान्वयें जन्मकुंडलींत खालीं दिल्याप्रमाणें योग होतात तेव्हां बहुधा लग्न ठरतें, किंवा विवाह घडतो. विवाहकाल हा रुढीवर अवलंबून असल्या कारणानें असे योग घडले असतांनाही विवाह झालेला आढळणार नाहीं; परंतु असे प्रसंग अपवादा प्रमाणें समजावे.

(१) विवाहकालीं मुलीस अगर मुलास साडेसाती नसावी. किंवा शनिचंद्राचा वाईट दृष्टियोग किंवा षडाष्टक नसावें.

(२) जन्मकालीन चंद्रास गुरु २।३।५।७।९।१० असावा.

(३) त्याचप्रमाणें जन्मकालचे रवीचे २।३।५।७।९।११ यास्थानीं गुरु आढळतो.

(४) गुरु जन्मकालचे शुक्राचे १।२।३।५।७।९।११ यास्थानीं असतो.

(५) तनु, धन, सप्तम, अष्टम व द्वादश या स्थानीं पापग्रह नसावे.

(६) गुरु सप्तमेशा बरोबर शुभदृष्टियोग करित असावा.

(७) कुंडलींतील शुभस्थानांतून गुरूचें भ्रमण होत असलेलें आढळतें. धन, पंचम, सप्तम, नवम, दशम व एकादश हीं स्थानें महत्वाचीं आहेत.

(८) जन्म कुंडलींतील २।५।७।११ ह्या स्थानाचें वर्ष असतें. किंवा शुक्राचें, चंद्राचें किंवा सप्तमेशाचें २।५।७।११ या स्थानाचें वर्ष असतें.

(९) सप्तमेश व कुटुंबेश आपले स्थानांत येतात किंवा उच्च असतात किंवा एकमेकांचे स्थानांत येतात.

(१०) सप्तमेश-कुटुंबेश, सप्तमेश-पंचमेश, सप्तमेश-एकादेश, कुटुंबेश व पंचमेश, किंवा कुटुंबेश व एकादशेश ह्यांची युती शुभस्थानांत झालेली आढळते.

(११) शुक्र हा मंगळ, चद्र, रवि ह्यांचे बरोबर शुभदृष्टियोग करित असतो.

(१२) सप्तमेश किंवा कुटुंबेश यांची शुक्राबरोबर शुभस्थानीं युती झालेली आढळते.

(१३) चंद्राचे सप्तमांत शुक्र, सप्तमेश, पंचमेश किंवा कुटुंबेश असतो.

(१४) शुक्र स्व–सप्तमांत, स्व–पंचमांत, धनस्थानांत, एकादश स्थानांत किंवा पंचमांत असतो.

(१५.) जन्मकालचे शुक्राचे सप्तमांत जायास्वामी, कुटुंबस्वामी किंवा पंचमेश असतो.

(१६) सप्तमेश जायास्थानीं, लग्नीं, पंचमस्थानीं किंवा कुटुंब स्थानीं असतो.

(१७) सप्तमेश लग्नेश किंवा कुटुंबेश किंवा पंचमेश लग्नेश यांची युती १।२।४।५।७।९।११ या स्थानांत किंवा शुक्राचे २।५।७।११ या स्थानांत झालेली आढळते.

(१८) सप्तमेश व शुक्र, कुटुंबस्वामी व शुक्र, लग्नस्वामी व शुक्र, किंवा पंचमेश व शुक्र यांची युती लग्नाचे, सप्तमेशाचे, कुटुंबस्वामीचे किंवा पंचमेशाचे शुभस्थानीं होते.

याप्रमाणें जितके जास्त बलवान योग ज्या वर्षी आढळतील त्यावर्षी बहुधा लग्न होतें. हे योग विवाहसंभवकालांत झाले असतां त्याचवर्षी विवाह खात्रीनें होतो. या नूतन रीतीचा जिज्ञासूंनीं अनुभव घेऊन पाहिल्यास त्यांची निराशा होणार नाहीं अशी खात्री आहे. जन्म कुंडलीचा चांगला विचार करितां आल्याखेरीज पुढील अनुमानें चांगलीं करतां येणार नाहींत. हें शास्त्र अनुभव सिद्ध असल्यामुळें आणखींही दुसरे नियम बांधतां येतील. प्रथम घडलेल्या गोष्टींचा कुंडलीवरून मेळ घालण्याची संवय करावी म्हणजे आपोआप पुढील गोष्टींचीं अचुक अनुमानें करितां येतील.

गुणमेलन.
किंवा
घटितविचार.

जन्मलग्न मिदमंगमंगिनां मेनिरे मन इतींदुमंदिरम् ॥
सौहृदं तु मनसोर्न देहयोर्मेलकस्तदयमिंदुगेहयोः ॥

अर्थः–**जन्मलग्न** हें मनुष्याच्या शरिरासारखें आहे आणि **जन्मराशि** ही मनुष्याच्या मना प्रमाणें आहे. वधूवरांचें घटित पाहणें परस्परांच्या प्रीती-साठींच आहे. ती प्रीति परस्परें मनाची असते. शरिरांची असत नाहीं. यास्तव घटित **जन्मराशि** पासूनच पाहावें.

घटित पाहण्याचे नियम कोणत्या शास्त्रीय तत्वावर बसविले आहेत यांची कांहींच कल्पना करितां येत नाहीं. व हे नियम प्रचारांत कसे आले याबद्दल समाधानकारक माहिती कोणत्याच ग्रंथांत मिळत नाहीं. चालू असलेला प्रघात अगदींच त्याज्य आहे असें आह्मास ह्मणवत नाहीं. घटित पाहण्याची हल्लीं रूढ असलेली पद्धत फार जुनी असली पाहिजे व त्यांत वारंवार सुधारणा केल्याचें आढळतें.

वर निश्चित करतांना खालील गोष्टींचा अवश्य विचार करण्यास आमचे ग्रंथकार सांगत आहेत. कुलवान, शीलवान, शरिरानें सुदृढ, वयानें २० वर्षांचेवर व ३० वर्षांचे आंत, दीर्घायु, धनवान, मातापितरानें युक्त, अशा गुणवान वराला पाणिग्रहण विधीनें आपली कन्यादान करावी. व अंध, मुका, धर्मभ्रष्ट, अपस्मारी, नंपुसक, दूरदेशीं राहणारा, कुष्ठी, जन्मरोगी, वृत्तीहीन–चाकरी–नोकरी नसलेला, अशिक्षित, दरिद्री, योद्धा, मोक्षाभि-लाषी, क्रोधी, परस्त्रीकडे पाप दृष्टी ठेवणारा, पंडुरोगी, गंडमालादिरोगानें पिडीत, निरुद्योगी, दुराचारी व पतित अशा वराला कन्यादान करूं नये.

ज्यास वरील सर्व गोष्टी पाहवयाच्या असतील त्यास नुसत्या गणमैत्रीवर अवलंबून राहतां येइल काय? व याप्रमाणें विचार न करितां एखाद्या अयोग्य वराला कन्या दिली तर खालील वचनांत सांगितल्या प्रमाणें "**अपरीक्ष्यवरं कन्या निर्गुणाय ददातियः॥ कुलं तस्यैव तच्छोकसंतप्तोवा निकृंतति ॥**" मागून पश्चाताप व शोक प्राप्त होतो.

वर्ण, वश्य, तारा, योनि, ग्रहमैत्री, गण, भकूट आणि नाडी याप्रमाणें वधुवरांचा विवाह करण्यापूर्वी आठ प्रकारची मैत्री जमवून पाहावी लागते. व त्यांचे वर्णापासून एक दोन तीन १० वाढते गुण आहेत. सर्व गुणांची एकंदर बेरीज ३६ होते, तीचे अर्धे १८ म्हणून अठरा पेक्षां अधिक गुण मिळाले असतां लग्न जुळविण्यास हरकत नाहीं असें शास्त्रकारांचें मत आहे.

घटित जुळवितांना जन्मकालीन चंद्र ज्या राशींत व नक्षत्रांत असतो त्या राशीस व नक्षत्रास जास्त महत्व देऊन त्यावरूनच पुढील सर्व गोष्टी ठरवितात, हा पक्ष गौण होय. रवि हा आत्मा, चंद्र हें मन व जन्मलग्न हे स्थूल शरीर दर्शवितें. या तीहींपैकीं एकास जास्त महत्व देणें शास्त्रीय दृष्टया व विचार दृष्टया बरोबर नाहीं; याचकरितां वधुवर पत्रिकेंत होणारे प्रीतियोग जास्त महत्वाचे आहेत कारण त्यांत वरिल मुख्य तीन गोष्टींचा विचार होऊन इतर ग्रहांचाही विचार होतो.

या भागांत घटित पाहण्याच्या जुन्या पद्धतीचें सविस्तर विवेचन केलेलें वाचकांस आढळेल.

१ वर्णकूट.

स्थूलदेहाचे व्यवहारांत ब्राह्मण, क्षत्रीय, वैश्य व शूद्र असे चार वर्ण मानिले आहेत; व तो वर्ण अगर ती जात, प्राणि ज्या मातापितरांचे उदरीं जन्म पावतो त्यावर अवलंबून असते मग आचारानें व कृतीनें तो कोणत्याही वर्णाचा असूं शकेल. तसेंच ज्योतिषशास्त्रांत चार वर्ण मानिले आहेत,

परंतु ज्योतिशास्त्रांत मानलेला वर्ण—जो जन्मकालीन चंद्राचे राशीवरून ठरवावयाचा असतो—याची स्थिती उलट देखील आढळूं शकेल. हा वर्ण सूक्ष्मशरिराचा द्योतक असावा असें वाटतें.

अग्निराशिः—मेष, सिंह व धन—यांचा क्षत्रिय वर्ण मानतात.

पृथ्वीराशिः—वृषभ, कन्या व मकर—यांचा वैश्य वर्ण मानतात.

वायुराशिः—मिथुन, तूळ व कुंभ—यांचा शूद्र वर्ण मानतात.

जलराशिः—कर्क, वृश्चिक व मीन—यांचा ब्राह्मण वर्ण मानतात.

वधुवरांचे राशीवरून त्यांचा वर्ण कोणता आहे हे वरिल माहिती वरून ठरवावें. वर्णाचा गुण एक मानतात; व वधुवरांचा एकच वर्ण किंवा वराचा उच्च वर्ण असतां गुण एक मानावा; व वधूचा वर्ण उच्च असतां गुण शुन्य मानावा. उच्चते संबंधानें ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र हाच क्रम आहे.

२ वश्यकूट.

द्वादश राशींचे मानव, वनचर असे कांहीं विशिष्ट भेद करून नैसर्गिक सृष्टीनियमा प्रमाणेंच विशिष्ट प्राण्याचें कोणाबरोबर सख्य तर कोणा बरोबर वैर कल्पिलें आहे व त्यावरूनच हा वश्य विचार ठरवावयाचा आहे. वश्यांत १ सख्य २ वैर व ३ भक्ष्य असें तीन प्रकार आहेतः—

चतुष्पादराशिः—मेष, व वृषभ.

मानवराशिः—मिथुन, कन्या, तूला, धन, व कुंभ.

जलचरराशिः—कर्क, मकर, मीन.

किटकराशिः—वृश्चिक.

ह्या पैकीं धनुराशीचा उत्तरार्ध व मकरेचा पूर्वार्ध हे चतुष्पाद मानतात; व धनुराशीचा पूर्वार्ध व मकरेचा उत्तरार्ध जलचर मानतात.

मनुष्य राशीला जलचरराशि भक्ष्य व सिंहा शिवाय सर्व वश्य आहेत; सिंहराशिला वृश्चिका वाचून सर्व वश्य आहेत. याशिंवाय आणखी वश्याचा विचार लोक व्यवहारानें करावा तो असा कीं मनुष्य राशीला चतुष्पादराशि वश्य आहेत, परंतु यवनादि जातीला त्या भक्ष्य आहेत.

वश्याचे पूर्ण गुण २ मानतात. वधुवरें एकाच मानव किंवा जलचर इत्यादि जातीचीं असतील तर पूर्ण गुण २; दोघांमध्यें सख्य असतां गुण १; दोघांत वैर असतां गुण ०; व एक दुसऱ्यास भक्ष्य असतां गुण ½ जाणावा.

३ ताराकूट किंवा दिनकूट.

अश्विनी, भरणी ह्याप्रमाणें जीं सत्तावीस नक्षत्रें आहेत त्यास **तारा** असें ह्मणतात व हीं नक्षत्रें जन्मकालच्या दिवशीं चंद्र ज्या अंशांत असतो त्यावरून घेतात, यासाठीं त्यांच्या मेळास '**ताराकूट**' अथवा '**दिन-कूट**' अशा संज्ञा शास्त्रकारांनीं दिल्या आहेत.

वराच्या नक्षत्रापासून क्रमानें वधूच्या जन्मनक्षत्रापर्यंत नक्षत्रें मोजावीं, जी संख्या येईल त्यास ९ नें भागावें बाकी ३।५।७ यांपैकीं राहिल्यास तारावळ अशुभ समजावें; परंतु बाकी ०।१।२।४।६।८ यांपैकीं राहिल्यास तारावळ शुभ आहे असें समजावें. तसेंच वधूच्या जन्मनक्षत्रापासून वराच्या जन्मनक्षत्रापर्यंत क्रमानें मोजून जी संख्या येईल त्यास ९ नें भागावें बाकी ३।५।७ राहिल्यास अशुभ व ०।१।२।४।६।८ राहिल्यास शुभ जाणावें.

ताराकूटाचे गुण ३ मानले आहेत. वधूची व वराची शुभतारा आली असतां गुण तीन; एकाची शुभ व दुसऱ्याची अशुभ आली असतां गुण १½; परंतु दोघांच्या तारा अशुभ आल्या तर गुण शून्य मानतात.

४ योनिकूट.

नक्षत्रांच्या निरनिराळ्या योनि अगर जाती—अश्व, गज, सिंह ह्या-प्रमाणें कल्पिल्या आहेत. जर वर्ण हा सूक्ष्म शरीर दर्शवितो असें मानलें तर योनि ह्या स्थूल देह दर्शक आहेत. वधु अगर वर यांचें जें जन्मनक्षत्र असतें त्या नक्षत्राची जी योनि असते तीच योनि त्यांची असते. पुढें लिहिल्या प्रमाणें अश्विन्यादि नक्षत्रांच्या योनि जाणाव्या.

नक्षत्र. योनि.	नक्षत्र. योनि.	नक्षत्र. योनि.	नक्षत्र. योनि.
आश्विनी—अश्व.	पुष्य—मेष.	स्वाती—महिषी.	अभिजित्—मुंगुस.
भरणी—हस्ती.	आश्लेषा-मार्जार	विशाखा-व्याघ्र.	श्रवण—वानर.
कृत्तिका—मेष.	मघा—उंदीर.	अनुराधा—मृग.	धनिष्ठा—सिंह.
रोहिणी—सर्प.	पूर्वा—उंदीर.	जेष्ठा- मृग.	शततारका - अश्व.
मृग—सर्प.	उत्तरा—गौ	मूळ—श्वान.	पूर्वाभाद्रपदा-सिंह.
आर्द्रा—श्वान.	हस्त—महिषी.	पूर्वाषाढा—वानर.	उत्तराभाद्रपदा-गौ.
पूनर्वसु—मार्जार.	चित्रा—व्याघ्र.	उत्तराषाढा-मुंगुस.	रेवती—हस्ती.

सिंह हस्ती; महिष अश्व; मार्जार उंदीर; श्वान हरिण; वानर मेष, गो व्याघ्र; मुंगुस सर्प; यांचें परस्पर महावैर मानतात.

अश्वयोनीचे—गाय, व्याघ्र व सिंह ह्यांचे बरोबर शत्रुत्व आहे व सर्प, मृग, वानर, ह्यांचेशीं मित्रत्व आहे.

गजाचेः—शत्रुत्व कोणाबरोबर नाहीं; व मित्रत्व मेष, सर्प, महिष व वानर यांचे बरोबर आहे.

मेषाचेः-श्वान, मूषक, व सिंह हे शत्रु; व गज, गौ, महिष व मुंगुस हे मित्र आहेत.

सर्पाचेः-मूषक व व्याघ्र शत्रु व अश्व व गज मित्र आहेत.

श्वानाचेः—मेष, मूषक, व्याघ्र मुंगुस व सिंह शत्रु व मित्रत्व कोणाबरोबर नाहीं.

मार्जाराचेः—सर्प, व्याघ्र व सिंह हे शत्रु व मृग [illegible] वानर हे मित्र आहेत

मृ[illegible]काचेः-मेष, सर्प, श्वान, सिंह व मुंगुस शत्रु व गौ मित्र.

गौचेः-अश्व, सिंह व सर्प, शत्रु व मेष, महिषी, मृग मित्र आहेत

महिषीचेः-सर्प व व्याघ्र शत्रु व गज, मेष, गौ, व सिंह मित्र आहेत.

व्याघ्राचेः–अश्व, गज, मेष, श्वान, मार्जार, महिषी, मृग व वानर शत्रु आहेत.

मृगाचेः–व्याघ्र शत्रु व मित्र अश्व, मार्जार व गौ.

वानराचेः शत्रु, व्याघ्र व मित्र अश्व, गज, मार्जार व मुंगुस.

मुंगुसाचेः–अश्व, मेष, श्वान, मूषक व गौ शत्रु व मेष व वानर मित्र आहेत.

सिंहाचेः–अश्व, मेष, श्वान, मूषक, व गौ शत्रु व महिषीबरोबर मित्रत्व आहे.

ज्या योनींचें दुसऱ्या योनींबरोबर महावैर, शत्रुत्व किंवा मित्रत्व सांगितलें नाहीं त्या एकमेकांस सम किंवा एक स्वभावाच्या जाणाव्या.

वधुवरांची एकच योनि असतां गुण चार, उभयतांचे योनींचें मित्रत्व असतां गुण तीन, एक स्वभाव असतां गुण दोनः–शत्रुत्व असतां गुण एक व महावैर असतां गुण शून्य मानतात. ह्याप्रमाणें वधुवरांच्या कुंडल्यांवरून योनिकूटाचा विचार करावा.

५ ग्रहमैत्री.

ग्रहविचारांत वधुवरांचे जन्मराशींचे स्वामींत असणारी मैत्री अथवा शत्रुत्व किंवा समत्व येवढेंच पाहण्याची चाल सध्यां प्रचारांत आहे व ग्रहांत अनिष्ट मंगळाकडेच लक्ष्य पुरविलें जातें, परंतु ह्यावर फक्त अवलंबून न राहतां लग्न, रवि, चंद्र इत्यादि मध्यें असणारे प्रीतियोग वगैरे गोष्टींचा ग्रहमैत्रींत विचार करणें जास्त शास्त्रीय व श्रेष्ठ आहे.

प्रत्येक राशीचा कोणता ग्रह स्वामी आहे हें मागील भागांत सांगितलेंच आहे; आतां येथें प्रत्येक ग्रहाबरोबर मित्रत्वानें, शत्रुत्वानें अगर उदासीनपणानें ह्मणजे मित्रही नव्हेत अगर शत्रुही नव्हेत अशा रीतीनें वागणारे कोण कोण ग्रह आहेत त्यांची माहिती खालील कोष्टकांत दिली आहे.

ग्रह.	मित्रग्रह.	शत्रुग्रह.	उदासीनग्रह अगर समग्रह.
रवि.	चंद्र; मंगळ; गुरु.	शुक्र; शनि.	बुध.
चंद्र.	रवि, बुध.	—	मंगळ; गुरु; शुक्र; शनि.
मंगळ.	रवि; चंद्र; गुरु.	बुध.	शुक्र; शनि.
बुध.	रवि; शुक्र.	चंद्र.	मंगळ; गुरु, शनि.
गुरु	रवि; चंद्र; मंगळ.	बुध, शुक्र	शनि.
शुक्र	बुध; शनि	रवि; चंद्र.	मंगळ; गुरु
शनि.	बुध; शुक्र.	रवि; चंद्र; मंगळ.	गुरु.

प्रथमतः वधुवरांच्या राशींचे स्वामी कोण आहेत हें मागें सांगितल्याप्रमाणें पाहावें, नंतर वरील कोष्टकाधारें मित्रत्व, शत्रुत्व, समत्व किंवा समशत्रुत्व, सममित्रत्व किंवा शत्रुमित्रत्व आहे हें पाहून ग्रहमैत्रीचे गुण ठरवावे.

वरील कोष्टकांत पाहिलें असतां असें आढळेल कीं, एखादा ग्रह एखाद्या ग्रहाचा मित्र असतो; परंतु तो ग्रह त्यास मित्र न मानितां शत्रु किंवा सम मानितो, म्हणजे त्यांचें शत्रुमित्रत्व, किंवा सममित्रत्व होतें. उदाहरणार्थ वराची राशि कर्क आहे व वधूची राशि मिथुन आहे. कर्केचा स्वामी चंद्र आहे व मिथुनेचा स्वामी बुध आहे. वरील कोष्टकांत पाहिलें असतां चंद्र हा बुधास मित्र मानितो परंतु बुध हा चंद्रास शत्रु मानतो, त्यामुळें येथें त्याचें शत्रुमित्रत्व आहे. ह्याप्रमाणें इतर प्रकार जाणावें.

वधूवरांच्या राशींचा स्वामी एकच असतां किंवा त्यांची परस्पर मैत्री असतां गुण ५; सममित्र असतां गुण ४; सम असतां गुण ३; शत्रुमित्रत्व असतां गुण १; समशत्रुत्व असतां गुण $\frac{1}{2}$ व शत्रुत्व असतां गुण शून्य मानावा. ह्याप्रमाणें ग्रहमैत्रीचा विचार करावा.

६ गणविचार.

मानवी प्राण्यांचे जन्मनक्षत्रावरून मनुष्यगण, देवगण, राक्षसगण असे तीन गण कल्पिले आहेत व त्यांचे मेळास ' गणकूट ' अशी संज्ञा आहे. सर्व प्राणिमात्रांत सत्व, रज, तम ह्याप्रमाणें तीन गुण आढळतात व ह्यासच देवगण, मनुष्यगण, व राक्षसगण मानिलें असेल.

पूर्वाफाल्गुनी. पुर्वाषाढा पूर्वभाद्रपदा आर्द्रा भरणी, रोहिणी, उत्तराफाल्गुनी, उत्तराषाढा, उत्तराभाद्रपदा ह्या ९ नक्षत्रांत जन्म पावणाऱ्या वधूचा अगर वराचा मनुष्यगण असतो. हस्त, रेवती, पुनर्वसु, पुष्य, स्वाती, मृग, श्रवण, आश्विनी, व अनुराधा ह्या ९ नक्षत्रांत जन्म घेणारांची देवगण असतो व कृत्तिका, आश्लेषा, मघा, चित्रा, विशाखा, जेष्ठा, मूळ, धनिष्ठा व शततारका ह्या ९ नक्षत्रांत ज्यांचा जन्म होतो त्यांचा राक्षसगण मानतात.

प्रथमतः वधुवरांच्या जन्मनक्षत्रावरून वर सांगितल्याप्रमाणें गण कोणते आहेत तें ठरवावें. गणाचे पूर्ण गुण ६ मानिले आहेत. वधुवरांचा एकच गण असतां किंवा वराचा देवगण व वधूचा मनुष्यगण असेल तर ६ गुण, वधूचा देवगण व वराचा मनुष्यगण असतां ५ गुण, एकाचा राक्षस व दुसऱ्याचा देवगण असतां १ गुण व एकाचा राक्षस व दुसऱ्याचा मनुष्यगण असतां गुण शून्य मानावा. दोघांचा एकच गण असेल तर परस्परांचें परस्परावर उत्तम प्रेम राहतें. मनुष्य आणि राक्षस ह्यांचे हाल देवदैत्यांचा नित्य कलह सर्वत्र प्रसिद्धच आहे. वराचा राक्षस व वधूचा मनुष्यगण असतां हानिप्रद मानिलें आहे; तथापि संकटकालीं असा विवाह करणें एकवार चालेल; उलट स्थिति असतां विवाह न करणें अति प्रशस्त होय.

७ भकूट अथवा राशिकूट.

ज्योतिःशास्त्रांत वधुवरांच्या राशींमध्यें असलेल्या अंतरावरून पाहण्याचें एककूट आहे त्यास राशिकूट किंवा भकूट असें ह्मणतात. षडष्टक,

नवपंचक, छिद्र्द्वादशक, तृतीयैकादश, चतुर्थदशम, सप्तसप्तक व एकच राशि असे सात प्रकार या कूटाचे मानिले आहेत.

वधुवरांच्या राशीपैकीं एकाच्या राशीपासून दुसऱ्याची राशि क्रमानें मोजून सहावी किंवा आठवी येत असल्यास षडष्टक असतें. त्याचप्रमाणें नववी किंवा पाचवी येत असल्यास नवपंचक, दुसरी किंवा बारावी येत असेल तर त्यास तृतीयैकादश, चवथी किंवा दहावी असेल तर त्यास चतुर्थदशम, सातवी असेल तर त्यास सप्तसप्तक असें ह्मणतात. व उभयतांचा चंद्र एकाच राशींत असतां एकराशि असते.

षडाष्टकें दोन प्रकारचीं आहेत; प्रीतिषडाष्टक व मृत्युषडाष्टक. राशींच्या स्वामींचें परस्परांत शत्रुत्व असून तें षडाष्टक कूट करीत असलें तर मृत्युषडाष्टक होतें. हें वधुवरास मृत्युकारक असल्यामुळें विवाहास अग्राह्य आहे. व परस्परांत मित्रत्व असून षडाष्टक असलें तर प्रीतिषडाष्टक मानतात, नवपंचक व छिद्र्द्वादशक हीं मध्यम शुभ आहेत. नवपंचक असतां अनपत्यत्व व छिद्र्द्वादशक असतां निर्धनत्व प्राप्त होतें. हा दोहोंचा दोष विशेष मानीत नाहींत. त्यांत वराची राशि कन्येच्या राशीपासून नवपंचकांत नववी व छिद्र्द्वादशकांत बारावी असतां मुळींच दोष नाहीं. चतुर्थदशम, तृतीयैकादश व सप्तसप्तक हीं शुभ आहेत. उभयतांची राशि एक असेल तर अति शुभ होय. उभयतांचें जन्मनक्षत्र एक परंतु भिन्न चरण असेल तरीही शुभ होय. उभयतांचीं जन्मनक्षत्रें भिन्न असतील किंवा एकच नक्षत्र असून भिन्न चरण असतील तर ३६ गुण मानतात. प्रत्येक नक्षत्राचे चार भाग करितात त्या प्रत्येक भागास चरण किंवा पाद असें ह्मणतात. वधुवरांची एक राशि असून वधूच्या नक्षत्रापासून वराचें नक्षत्र दुसरें नसावें कारण वधूच्या नक्षत्रापासून वराचें नक्षत्र दुसरें असल्यास वरास मृत्यु प्राप्त होतो, असें अनिष्ट फल सांगितलें आहे. तसेंच वधूचें नक्षत्र कृत्तिका, आश्लेषा व शततारका यांपैकीं एक असून वराचें नक्षत्र भरणी, पुष्य व धनिष्ठा यांपैकीं असेल तरीही विवाह करूं नये.

प्रीतिषडाष्टक, नवपंचक व द्विर्द्वादशक यांत वरदूरत्व असून ग्रहमैत्री असेल तर सहा गुण मानतात, आणि ग्रहमैत्री असून स्त्रीदूरत्व असेल तर चार गुण मानतात. वधूच्या राशीपासून वराची राशी षडाष्टकांत आठवी, नवपंचकांत नववी, द्विर्द्वादशकांत बारावी असली ह्मणजे वरदूरत्व होतें, आणि वराच्या राशीपासून वधूची राशि आठवी, नववी व बारावी असतां स्त्रीदूरत्व होतें. ग्रहशत्रुत्व असून स्त्रीदूरत्व असतां एक गुण धरावा. वधुवरांचें जन्मनक्षत्र एकच असून चरणही एकच असेल तर मात्र शुन्य गुण जाणावा.

षडाष्टक, नवपंचक व द्विर्द्वादशक हीं कूटें अशुभ मानिलीं आहेत. वधुवरांच्या कुंडल्यांत षडाष्टक चांगलें नव्हे मग तें मृत्युषडाष्टक असो किंवा प्रीतिषडाष्टक असो. नवपंचयोगानें संततीचा नाश होतो असें मानिलें आहे. परंतु एवढ्याच योगानें संततीचा नाश होईल असें वाटत नाहीं, उलटपक्षीं तें अशुभ नसून शुभ आहे. वरील योग असलेल्या दंपत्यांत फारच प्रीति आढळते. द्विर्द्वादशकानें विर्धनत्व प्राप्त होतें असें ह्मणतात, परंतु तें काय आधारानें दिलें असावें हें समजत नाही. सांपत्तिक स्थिती संबंधानें मागें सांगितल्याप्रमाणें वधुवरांच्या जन्मकालीन कुंडल्यांवरूनच विचार केला पाहिजे. नुसतें द्विर्द्वादशकानें निर्धनत्व खात्रीनें प्राप्त होणार नाहीं. तृतीयैकादश हा योग चांगलाच आहे व ह्याचें फळ नवपंचमासारखेंच मिळतें. चतुर्थदशमांत वधूच्या राशीपासून वराची राशि दहावी असतां उत्तम.

८ नाडीविचार.

सर्व कूटांत नाडीचा विचार जास्त महत्वाचा मानिला असून सर्वांत तिलाच जास्त गुण दिले आहेत. परंतु नाडीचा विचार कां केला पाहिजे ह्याबद्दल सविस्तर विवेचन केलेलें कोठेंच आढळत नाहीं. फक्त वधुवराची एकनाड असतां विवाह करूं नये, व केला असतां काय होईल हें सांगितलें आहे.

मूळ, ज्येष्ठा, हस्त, शततारका, पूर्वाभाद्रपदा, पुनर्वसु, उत्तराफाल्गुनी, आर्द्रा, अश्विनी ह्या ९ नक्षत्रांत ज्यांचा जन्म होतो त्यांची **आद्य-नाडी**; भरणी, मृग, पुष्य, अनुराधा, पूर्वाफाल्गुनी, धनिष्ठा, चित्रा, पूर्वाषाढा, उत्तराभाद्रपदा ह्या ९ नक्षत्रांत ज्यांचा जन्म होतो त्यांची **मध्य-नाडी**; कृत्तिका, रोहिणी, आश्लेषा, मघा, स्वाती, विशाखा, उत्तराषाढा, श्रवण, रेवती ह्या ९ नक्षत्रांत ज्यांचा जन्म होतो त्यांची **अंत्य-नाडी** असते.

नाडीचे गुण आठ मानिले आहेत. वधुवरांची भिन्न नाडी असतां त्याचे गुण आठ धरतात. दोघांची नाडी एकच असेल तर विवाह करूनये व गुण शून्य मानावा. परंतु ह्यास खालीलप्रमाणें थोडे अपवाद आहेत. '**एक नक्षत्र जातानीं नाडी दोषोन विद्यते**' ह्मणजे वधुवरांचा एकाच नक्षत्रावर जन्म झाला असेल तर त्यामुळें जी एकनाड येते तिचा दोष मानूं नये. त्याचप्रमाणें '**राश्यैके भिन्नमृक्षंच नाडी दोषेन मन्येते**' ह्मणजे भिन्न नक्षत्र असून दोघांची एकच राशि असेल तर नाडीदोष मानूं नये; किंवा दोघांचें नक्षत्र एक असतां राशि वेगळया असतील तर **वैर, गणशुद्धि, एकनाडी** आणि नृदूरत्व या चोहोंचा दोष नाहीं. या शिवाय जी एकनाडी ती मात्र सर्वथा वर्ज्य करावी. वधुवरांचें जन्मनक्षत्र एक असून भिन्न चरण असतां नाडीदोष मानीत नाहींत एवढेंच नव्हे तर उलटपक्षीं त्यांचा विवाह करणें फार उत्तम मानलें आहे.

ह्याप्रमाणें येथपर्यंत चालू असलेल्या सर्व जुन्या पद्धतींचें सविस्तर विवेचन केलें आहे. केवळ या कूटांकडे पाहत बसून जन्मकुंडल्यांकडे दुर्लक्ष करणें कधींच शहाणपणाचें होणार नाहीं. वाईट असलेल्या **नाडी** वगैरे दोषास दानें वगैरे देऊन लग्नें करावीत; ह्याप्रमाणें पूर्ण मोकळीक दिली आहे!! त्याचप्रमाणें **गोदानदीच्या दक्षिणेकडील** देशांत सर्व **वर्णाला** आणि सर्व देशांत **क्षत्रियादिकांला** दुसरी कन्या मिळत नसेल तर उभयतांचीं **नक्षत्रें**

आद्य नाडींत किंवा अंत्यनाडींत असतां शुभ मानावी. असें प्रतिपादन केलें आहे ! ! राशी स्वामीची मैत्री असतां द्विर्द्वादशक व नवपंचक देखील शुभ होतें ! ! वश्य, तारा, योनि, ग्रह, गण, नाडी हीं ६ शुभ असतील तर षडाष्टक शुभ होतें ! ! शुभकूट आणि ग्रहमैत्री असेल तर वधूचा मनुष्यगण व वराचा राक्षसगण शुभ मानतात ! !

दोन्ही कुंडल्यांत होणारे प्रीतियोग, आयुर्मर्यादायोग, वैधव्ययोग इत्यादि गोष्टी फार महत्वाच्या असून त्यांचाच चांगला विचार केला पाहिजे; त्याखेरीज ३६ गुण जुळविण्याची खटपट सारी व्यर्थ होय. वधुवरांचा जन्मकाल हा बहुशा अदमासाचाच असतो व त्याच कालावरून केलेल्या स्थूल कुंडलीवरून मंगळ वगैरे ज्योतिषी लोक पाहतात, ही शास्त्रीय पद्धत नव्हे. व ह्याच कारणामुळें कित्येक आईबापांच्या मागें उगाच मंगळाचा ससेमिरा लागलेला आढळतो. ह्याप्रमाणें बनावट व खोट्या पत्रिकेवरून लग्नाचा विचार करण्यापेक्षां पत्रिका न पाहतां लग्नें ठरविणें हा सरळ मार्ग होय.

विवाहांस शुभ मुहूर्त.

कोणत्याही कार्याचा आरंभ शुभ दिनीं करण्याची चाल सर्व राष्ट्रांत आढळेल; त्यांत विवाहासारख्या मुख्य महत्वाच्या संस्कारास सुमुहूर्त अथवा शुभ दिवस पाहण्याची चाल हिंदु, जैन, शीख, पारशी, मुसलमान, चिनी, जपानी, प्राचीन ग्रीक व रोमन वगैरे पुष्कळ लोकांत आहे. परंतु सुमुहूर्ताकरितां हिंदु लोकांत जेवढी चिकित्सा करितात तेवढी इतर कोणत्याही लोकांत करीत नाहींत. विवाह शुभपरिणामक व्हावा, वधुवरें आनंदानें व सुखांत राहावीं हाच सुमुहूर्त पाहण्याचा मुख्य उद्देश आहे; व तो केव्हांही वावगा होणार नाहीं. परंतु आजकाल मुहूर्ताची फारच तारांबळ उडाली आहे. मुहूर्त शोधून काढण्याचें मुख्य साधन जें आमचें वेदशास्त्रपुराणोक्त

पंचांग त्याचीच फार शोचनीय स्थिति झाली आहे. अलीकडे पंचांगें कितीतरी झालीं आहेत ! ! परंतु एकमेकांत मेळ मुळींच आढळणार नाहीं. एकांत विवाहमुहूर्त दिले आहेत तर दुसरा शुक्राचा अस्त ह्मणत आहे !.! ह्या लहानशा पुस्तकांत मुहूर्ताबद्दल सविस्तर माहिती देणें शक्य नाहीं, करितां महत्वाची माहिती दिली आहे व तेवढ्यानें इष्टकार्य होईल असें वाटतें.

कोणतेंही कार्य योग्यवेळीं व सुमुहूर्तावर केलें असतां क्वचितच हताश होण्याचा प्रसंग येतो. परंतु **सुमुहूर्त** काढण्याचें काम किती हुशारीनें व बारीक रीतीनें करावें लागतें ह्याची थोडी तरी कल्पना खालील माहिती-वरून होईल. विवाहास शुभमुहूर्त पाहतेवेळीं खालील निषिद्ध गोष्टींचा विचार करावयास सांगितलें आहे:—

(१) पंचांगशुद्धीरहित असलेल्या दिवसाचा दोष मानतात. पंचांगांत तिथी, वार, नक्षत्र, योग व करण हीं कालाचीं मुख्य पांच अंगें दाखवि-लेलीं असतात.

(२) उदयास्ताचा दोषः—ग्रह जेव्हां सूर्याजवळ येतात तेव्हां सूर्याचे प्रखर तेजामुळें ते दिसेनासे होतात ह्मणजे त्यांचा अस्त होतो; व पुन्हा ते सूर्यापासून लांब गेले ह्मणजे दिसूं लागतात त्यास उदय ह्मणतात. ग्रह व नक्षत्रें या प्रत्येकास उदयास्त आहेत; परंतु गुरु शुक्रांच्या उदयास्ताचा धर्मकृत्याशीं संबंध आहे. कारण शुभकार्यें करणें असतां अत्यंत शुभ ग्रह जे गुरु व शुक्र त्यांचा अस्त असणें कधींही शुभ मानिलें जाणार नाहीं. परंतु ह्या उदयास्ताची हल्लीं पंचागांचे स्थूल गणितामुळें फारच [illegible]ंबळ उडत आहे. गुरु शुक्राचा अस्त असतां चौल, मुंज, देवांची अर्चा, विवाह, ग्रह-प्रवेश, वास्तुप्रतिष्ठा इत्यादि कृत्यें करूं नयेत असें सांगितलें आहे.

(३) संक्रांती दोषः—ग्रहांचें एका राशींतून दुसऱ्या राशींत जाणें ह्याला **संक्रमण** ह्मणतात. रवीच्या संक्रमणाला ३२ घटि, चंद्राच्या २

घटि, मंगळाच्या ९ घटि, बुधाच्या २ घटि, गुरुच्या ८४ घटि, शुक्राच्या ६ घटि व शनीच्या १५० घटि संक्रमण होण्यापूर्वी अर्ध्या व नंतर अर्ध्या घटि सोडाव्या. सर्वांत रवि संक्रमणाच्या पूर्वींच्या व नंतरच्या अर्ध्या घटि फार दोषयुक्त मानल्या आहेत.

(४) पापग्रहांचे षडवर्ग नसावे. ग्रह, होरा, द्रेष्काण, नवमांश, द्वादशांश व त्रिंशांश अशा क्रमानें ६ वर्ग आहेत. शुभग्रहाचा वर्ग उत्तम ह्मणून तो ग्राह्य होय. चारांहून कमी शुभवर्ग येणारें लग्न मंगल कार्याला घेऊं नये.

(५) . विधगंडांत नसावें:–कालगणणेच्या साधनांचे जे अनेक भाग कल्पिले आहेत त्यांतले समीपवर्ती कोणतेही दोन विभाग एकत्र घेतले असतां एका विभागाचा शेवट व दुसऱ्याचा आरंभ मिळून होणाऱ्या कालास **कालसंधी** असें नांव दिलें आहे. या कालसंधीपैकीं कित्येक संधीचे प्रसंगीं मांगलिक कृत्यें करूं नयेत असें सांगितलें आहे व ह्याच कालसंधीस **गंडांत** ह्मणतात. हे गंडांत तीन आहेत (१) नक्षत्रगंडांत. (२) लग्नगंडांत व (३) तिथिगंडांत.

(१) **नक्षत्रगंडांत:**––

आश्लेषा, ज्येष्ठा व रेवती ह्या नक्षत्रांच्या शेवटच्या २ घटिका आणि मघा, मूळ व अश्विनी ह्यांच्या आरंभाच्या २ घ. मिळून ४ घटिका नक्षत्रगंडांत असतो.

(२) **तिथिगंडांत.**

पूर्णातिथि. ह्मणजे पंचमी, दशमी, पौर्णिमा व अमावास्या ह्यांची शेवटची १ घटिका आणि षष्टि, एकादशी व प्रतिपदा ह्यांची आरंभाची १ घटिका मिळून २ घटिका तिथिगंडांत असतो.

(३) लग्नगंडांत.

कर्क, वृश्चिक व मीन ह्या लग्नांची शेवटील अर्धी घटिका आणि सिंह, धन व मेष ह्यांच्या आरंभीची अर्धी घटिका मिळून १ घटिका लग्नगंडांत असती.

(६) कर्तरीदोष नसावा:—जेव्हां पापग्रह लग्न किंवा चंद्र याचे धन व द्वादशस्थानीं असतात तेव्हां कर्तरीदोष होतो.

(७) वधुवराचे लग्नापासून किंवा राशीपांसून अष्टमस्थानंताल लग्न विवाहकालास वर्जावें.

(८) विषघटि नसाव्या. कांहीं नक्षत्रांच्या विशिष्ट घटिका अशुभ मानिल्या आहेत त्यांस विषघटि ह्मणतात.

(९) दुष्टमुहूर्त, ग्रहण व उत्पात नक्षत्र, यामार्ध, लत्तादोष, पापग्रहविद्ध नक्षत्र, अशुभ नवमांश, महापात व वैधृतीयोग हीं नसावींत.

ह्या शिवाय जामित्रदोष, कुलीक, काल, कंटक, यमघंट, क्रांतीसाम्य, चंडायुध, एकार्गलादोष व पंचकदोष इत्यादि पुष्कळ गोष्टींचा विचार करण्यास सांगितलें आहे.

(१०) वैशाख, ज्येष्ठ, माघ, फाल्गुन व मार्गशीर्ष हे पांच महिने विवाहाला शुभ होत. वधु आणि वर हीं दोघेंही प्रथम गर्भोत्पन्न असतां त्यांच्या विवाहाला ज्येष्ठ मास सोडावा.

(११) मूळ, रेवती, हस्त, मघा, रोहिणी, उत्तराफाल्गुनी, उत्तराषाढा, उत्तराभाद्रपदा, मृगशीर्ष, स्वाती व अनुराधा हीं ११ नक्षत्रें विवाहाला शुभ मानतात.

(१२) जन्मलग्न व जन्मराशि ह्यांपासून अष्टमलग्नें, त्यांचे अधिपती आणि अष्टमस्थानीं असणारे जे ग्रह, त्यांचे नवमांश व राशि, विवाहलग्नीं असून जर जन्मलग्न व जन्मराशि ह्यांचे स्वामी आणि अष्टमांचे स्वामी ह्यांची परस्पर मैत्री नसेल, किंवा त्या दोहोंचा स्वामी एकच नसेल

तर ते मृत्युकारक होतात. परंतु मैत्री असतां अथवा स्वामी एक असतां शुभ होत. तूळ, मिथून, कन्या यांचे नवमांश शुभ होत. बुधावांचून अस्तंगत ग्रहाचे राशि व नवमांश, तसेच चंद्रानें व खलग्रहानें युक्त राशि व नवमांश मृत्यु करितात. बलहीन ग्रहाचे राशि व नवमांश दीनत्व करितात. वर्गोत्तमावांचून अंत्य नवमांश विवाह लग्नास देऊं नये. [लग्न व नवमांश एक असतो त्याला वर्गोत्तम म्हणतात. जसा मेषलग्नाचा मेषनवमांश, वृषभेचा वृषभनवमांश वर्गोत्तम जाणावा.] चंद्र तूळ व मकर राशिला असतां चर लग्नाचा चरनवमांश विवाहाला देऊं नये.

(१३) विवाहाच्या इष्टलग्नीं चंद्र व खलग्रह, षष्ठस्थानीं चंद्र व शुक्र, सप्तमस्थानीं शुभ व पापग्रह, दशमस्थानीं बुध, द्वादशस्थानीं चंद्र, चतुर्थस्थानीं राहु, अष्टमस्थानीं मंगळ व शुभग्रह आणि तृतीय शुक्र हे सर्व शोककारक जाणावे. एकादशस्थानीं सर्व ग्रह, पूर्वीच्या निंद्यस्थानावांचून सर्वस्थानीं शुभग्रह अष्टम मंगळावांचून ३।८।६ या स्थानीं खलग्रह आणि ३।४।२ ह्या स्थानीं चंद्र विवाहाला लक्ष्मीप्रद मानतात. विवाहलग्नाचा नवमांश, लग्न, द्रेष्काण ह्यांचे स्वामी अष्टम व षष्ठ असतां मृत्युकारक जाणावे.

विवाहकालीन इष्ट लग्नापासून केंद्रस्थानीं (१–४–७–१०) व कोणस्थानीं (९।५) बुध असतां १०० दोषांचा नाश करितो; त्याच स्थानीं शुक्र असतां २०० दोषांचा नाश करितो व गुरु असतां एक लक्ष दोषांचा नाश करितो असें शास्त्रकारांचें मत आहे.

वधूप्रवेशास मुहूर्त.

विवाहापासून सोळा दिवसांचे आंत सर्व सम दिवशीं व ७।५।९ ह्या विषम दिवशीं वधूप्रवेश करावा. सोळा दिवसांनंतर महिन्याचे आंत विषम दिवशीं करावा. महिन्यानंतर वर्षपर्यंत विषम मासांत करावा. वर्षापुढें पांच

वर्षांच्या आंत विषम वर्षी करावा. त्यानंतर इच्छा होईल तेव्हां करावा. वैशाख, फाल्गुन व मार्गशीर्ष ह्यांच्या शुक्लपक्षांत श्रवण, धनिष्ठा, विवाह-नक्षत्रें, चित्रा, अश्विनी, पुष्य ह्या नक्षत्रांवर जुन्या घरांत, रात्रौ, स्थिर-लग्नीं—वृषभ, सिंह, वृश्चिक, व कुंभ लग्नावर वधूप्रवेश करावा.

वैधव्यदोषनिवारण.

मागील भागांत मुहूर्ताविषयीं थोडी माहिती दिली आहे आतां ह्या भागांत वैधव्यदोष, विषकन्यादोष वगैरे दोष निवारण्यास शास्त्रकारांनीं कांहीं कृत्यें, दानें इत्यादि करावयास सांगितलीं आहेत; त्याबद्दल थोडीबहुत माहिती सांगून ग्रंथ समाप्त करण्याचें योजिलें आहे. कन्येस वैधव्यदोष केव्हां असतो ह्याविषयीं मागील भागांत सांगितलेंच आहे.

(१) ज्या कन्येचा जन्म शनि, मंगळ, रवि ह्या वारीं जर शतता-रका, कृत्तिका, आश्लेषा ह्यांतलें कोणतेंही नक्षत्र व द्वितिया, सप्तमी, द्वादशी, यांतून एक तिथि येईल, तर त्या नक्षत्रतिथींच्या योगावर जन्मलेली मुलगी विषकन्या जाणावी. जन्मकुंडलींत दोन शुभग्रह शत्रुगृहीं असून तो जन्म-लग्नीं असेल तर तोही विषकन्यायोग जाणावा.

(२) आपल्या शत्रुगृहीं असणारा एक पापग्रह लग्नीं असतां विषक-न्यायोग होतो. जन्मलग्नीं शनि, पंचमांत रवि, नवमस्थानीं मंगळ अशा योगावर जन्म पावणारी कन्या विषकन्या होय. मूळ नक्षत्राचे पहिल्या तीन चरणांवर जन्म पावणारी कन्या आपल्या श्वशुराचा नाश करिते. आश्ले-षाच्या शेवटच्या तीन चरणांवर जन्म पावलेली कन्या सासूचा नाश करिते. जेष्ठा नक्षत्राच्या चतुर्थ चरणावर जन्म पावलेली कन्या वडील दिराचा नाश करिते. विशाखाच्या चतुर्थ चरणावर जन्मणारी कन्या दिराचा नाश करिते.

आपल्या कन्येस चांगलें सुख मिळावें लग्नानंतर तिचा संसार चांगला चालावा अशी पित्याची आपल्या कन्येबद्दल उत्कट इच्छा असतें. मुलीच्या जन्मकालीन वैधव्यदोषामुळें, अनिष्ट मंगळामुळें किंवा विकषन्या योगामुळें तिला वैधव्य येण्याची भीति असते, जर कांहीं दैविक उपचार केले तर हे दोष नडत नाहींत व तीस असलेले दोष भंग पावतात असें शास्त्रकारांचें मत आहे. हे दोष निवारण होण्याकरितां पित्यानें कन्येकडून विवाहापूर्वी **सावित्रीव्रत, पिप्पलव्रत** (किंवा शमी बोरी ह्याही चालतात) घेण्यास सांगावें, वरील झाडाचे तळाशीं कन्येकडून आळें करवून झाडास दररोज पाणी घालवावें, चैत्र व आश्विन महिन्यांत शु. ३ पासून एक महिनाभर ब्राह्मण व सुवासनी यांची पूजा यथासांग करवावी, त्याचप्रमाणें कळकाच्या पात्रांत **पार्वतीची** चंदन, अक्षता, दूर्वा, बेल इत्यादि उपचारांनीं यथासांग पूजा करवून देवीस दररोज नैवेद्य समर्पण करावा ह्मणजे वैधव्यदोषांचा परिहार होतो. **मार्कंडेय पुराणांत** कुंभविवाह, वृक्षसेवा, प्रतिमापूजन इत्यादि उपाय सांगितले आहेत. कुंभविवाहांत कुंभ ह्मणजे मृत्तिकेचा घट आणि मुंथनी यांचा विवाह लावून नंतर तो घट फोडून उदकांत टाकावा व नंतर पंच पल्लवांच्या उदकानें कन्येस अभिषेक करावा इत्यादि प्रकाराचा विधि सांगितला आहे. वृक्षसेवा, अश्वत्थविवाह अथवा पिप्पलव्रत हीं कशीं करावीं हें वर सांगितलेंच आहे. ह्याखेरीज प्रतिमाविवाहही सांगितला आहे. विष्णूची सुवर्णाची प्रतिमा करून तिचे बरोबर कन्येचा विवाह करितात व नंतर ती प्रतिमा ब्राह्मणास दान देतात.

ह्याप्रमाणें दोषनिवारण्यासाठीं, प्राचीन ग्रंथकारांही माहिती सांगून ठेविली आहे परंतु अलीकडील आईबाप ह्याचा किती उपयोग करीत असतील ह्याबद्दल बरीच शंका वाटते. उलटपक्षीं कन्येच्या कुंडलींत वाईट दोष असतां तो बदलून वराच्या पत्रिकेशीं मिळती येईल अशी बनावट पत्रिका करण्यापर्यंत मजल आली आहे. कन्यादानानें पुण्य लागतें असें मानण्याचें सोडून कन्या ही एक मोठी उरावरील धोंड आहे किंवा ती एक

न टाळतां येणारी आपत्ती आहे असा समज होत चालला असून कसें तरी ह्या संकटांतून मुक्त होण्याकारितां प्रत्येकजण आपआपल्या परीनें प्रयत्न करीत आहे असें दिसून येतें ! ! विवाहाच्या उदात्त कल्पनाची राखरांगोळी होते किंवा हल्लीं असलेली स्थिति बदलून चांगली स्थिति येईल किंवा नाहीं ह्याची आज कांहींच कल्पना कारितां येत नाहीं. परंतु जरा लांबवर नजर फेंकिली तर जिकडे तिकडे क्रांती होत असलेली आढळेल तर मग आमच्या ह्या विवाहसंस्थेमध्यें सुधारणा कां होऊं नये ? हुंड्यासंबंधी वगैरे घातुक चालीस अजिबात फाटा मिळून पुन्हा पूर्वीप्रमाणें विवाहसंस्थेचे उदात्त मताची स्थापना कां होणार नाहीं. शेवटीं त्या **जगचालक प्रभूची** अनन्यभावें करूणा भाकून व ज्यानें थोडेंबहूत ज्ञानामृत दिलें त्या गुरूस नमन करून विवाहप्रदीपाची समाप्ती करतों.

समाप्त.

गाईड:— (इंग्रजी) डॉ० भांडारकर यांच्यां संस्कृत दुसऱ्या पुस्तकाच्या पहिल्या बारा धड्यांचें—यांत दुसऱ्या व तिसऱ्या गणांचे सर्व तर गणांचे कठीण धातू चालवून दिले आहेत; रूपें सिद्ध करून दाखविलीं आहेत; सर्व यांचें भाषांतर व समजुतीच्या टिपा दिल्या आहेत. किं० आठ आणे. तसेंच संस्कृत पहि पुस्तकाचें गाईड (इंग्रजी) यांत सर्व संधि नियमांचें स्पष्टीकरण व उदाहरणें—सर्व यांचे भाषांतर असून वाक्यांत लागणाऱ्या नियमांचा निर्देश केला आहे. किंमत सहा आणे.

की:—— तर्खडकरकृत भाषांतर पाठमाळा भाग तिसरा व भाग दुसरा यांच्या—यांत सर्व वाक्यांचें भाषांतर, विशेष समजुतीकरितां वाक्य-नेविषयीं कांहीं अधिक नियम, मूळ पुस्तकांत नसलेले परंतु वाक्यांत जरूर लागणारे बरेच व सूचना दिल्या आहेत. किंमत अनुक्रमें ५ आणे व ३ आणे.

विद्यार्थ्यांचें हँडबुक:— (नवीन पद्धतीचें) इंग्रजी पहिल्या, दुसऱ्या व तिसऱ्या इयत्तेकरितां अत्यंत उपयुक्त. किंमत ९ पै.

भूगोलवर्णन:— (चारही खंडांचें) यांतील माहिती पद्धतशीर व सुबोध रीतीनें दिली असून विशेष ध्यानांत ठेवसारख्या गोष्टी व आवांतर भरपूर माहिती दिली आहे. किंमत २॥ आणे.

हिंदुस्थानच्या इतिहासांतील चरित्रें व ठळक गोष्टींचे सन:— (मराठी ५।६।७ व इंग्रजी १।२।३ या इयत्तांतील विद्यार्थ्यांकरितां) यांत मुसलमानी अमलापासून १८५७ पर्यंतच्या प्रमुख राज्यकर्त्यांचीं व इतर प्रसिध्द पुरुषांचीं सुबोध व संगतवार चरित्रें असून इतिहासांतील सर्व ठळक गोष्टी व सनही दिले आहेत. किंमत २॥ आणे.

अपूर्व मराठी पंचांग:— (शके १८१६ ते १८३५ पर्यंत) यावरून वीस वर्षांतील **तिथी** व **वार** सहज रीतीनें समजतात. याची रचना फार **कल्पकतेची** असून हें दोन रंगांत **मोहक** छापलें आहे. किं. ८२ आणे.

(एक रुपयाचे आंतील मागणीस टपाल व व्ही. पी. खर्च निराळा पडेल.)

बक्षिस:— तूर्त कांहीं दिवस पांच किंवा पांच आणे किमतीच्यावरील प्रत्येक पुस्तकामागें वरील **अपूर्व मराठी पंचांग** बक्षिस मिळेल.

विशेष सूचना:— शिक्षक व बुकसेलर्स यांचे प्रमाणें **विद्यार्थ्यांसही भरपूर कमिशन** मिळेल. तरी त्यांनीं **संघशक्तीनें** आपला **फायदा** करून घ्यावा.

पत्ता:—पटवर्धन आणि मंडळी, रत्नागिरी.

रा० स. शो. प्रेस.